साधूंनी यद्यपि शरीरावरील ममत्व सोडले असले तरी ते रत्नत्रय प्राप्त करून देण्यास सहायभूत आहे अ्से मनात आणून, त्यांना सरस-निरस, आले, कोरडे, मऊ , निब्बर जसे मिळेल तसे अन्न देऊन, रत्नत्रयाचे साधन म्हणून कृतघ्य देहाचे ते संरक्षण करतात. जर अकाली हे नष्ट होईल तर त्यापासून मरणोत्तर देवादिक पर्यायात उत्पन्न व्हावे लागेल. तेथे असंख्यात वर्षेपर्यंत असंयमी राहून कर्मबंध तोडता येणार नाही. याकरिता आताच आहारादिकांचा त्याग करून या शरीराचा नाश केला तरी कर्ममय (कर्माण) देह थोडाच नाहीसा होणार आहे ( शरीर नष्ट झाले तर पुन: नवे प्राप्त होईल. म्हणून सर्व शरीराला उत्पन्न करणारे जे कर्माणदेहच बीज तेच नाहीसे करण्याचा प्रयत्न करावा.

यासाठी कषाय जिंकावे . विषयांचा निग्रह करावा. शेहेचाळीस दोष टाळून, बत्तीस अंतराय पाळून, चौदा मलांचा परिहार करुन, आपणाकरिता न केलेला असा शुध्द आहार प्राप्त होईल तरच घ्यावा. अर्धे पोट अन्नाने व चतुर्थांश पाण्याने व ध्यानाध्ययन, कोयोत्सर्गादि सुखाने करता यावे म्हणून चतुर्थांश रिकामे ठेवून आहार ग्रहण करावा. भोजनाचे आमंत्रण स्वाकारू नये, याचना करू नये, हात व डोळे वगैरेंनी खुणा करू नयेत. अशा साधूंना आहारादिकंचे दान देणे याला वैयावृत्य म्हणतात.

दान हे अनपेक्षितोपचारोपक्रिय असावे. प्रत्युपकाराची इच्छारहित म्हणजे यापासून आमच्यावर काहीतरी साधू उपकार करतील अशी इच्छा मनात नसावी व उपक्रिय म्हणजे प्रसना्न होऊन आम्हास विद्या, मंत्र, औषध वगैरे देतील अशी इच्छा नसावी. तसेच मुनीश्वरांना दान देण्याने आपली शहरात दाता महणून कीर्ती होॅल अथवा राजा मोठा मान देईल, आपल्य घरी अतूट सपतती प्राप्त होईल, पूर्वी दान देणार्‍याला पंचाश्चर्याची प्राप्ती झालेली आहे. म्हणून आपणालाही लभ होईल, असे अनेक विकल्प अथाव इच्छा मनात न आणता केवळ रत्नत्रय धारम करणाऱ्यावर भक्ती ठेवून त्यापासून आपम कृतार्थ झालो असे मानून, मन-वचन-काय व गृहाचराच पाया ही आज दान देणयाने कृतार्थ झाली असे समजून दान करावे व मोठ्या आनंदाने आपण आज कृतकृत्य झालो असे समजावे हेच वैयावृत्यचे लक्षण आहे.

वैयावृत्याचे विशेष स्वरूप

व्यापत्तिव्यपनोद: पदयो: संवाहनं च गुणरागात् ।

वैयावृत्यं यावानुपग्रहो(न्यो(पि संयमिनाम् ।। ११२ ।।

अन्वयार्थ - (संयमिनां) संयमी पुरुषांच्या (गुणरागात्) गुणावर प्रती करून (व्यापत्तिव्यपनोद:) त्यांच्या विपत्ती नाहीशा करणे, (पदयो: संवाहनं च) त्ांचे हात, पाय रगडणे (यावान् अन्य: अपि उपग्रह:) यासारखी आणखी जितकी मुनीवर उपकार करणारी कृत्ये असतील त्या सर्वांस (वैयावृत्यं) वैयावृत्य म्हटले आहे.

विशेषार्थ - साधूंवर कोणी देव मनुष्य, तिर्यंचाकड्दनन अथवा अचेतन पदार्थापासून उपसङ्गग पप्रपात् झाला तर तो आपल्या शक्तीप्रमामे नाहीसा करावा. शसाधूंना रस्त्याचत चौर, भिल्ल वगैरे दुष्ट लोकांनी त्रास दिला असेल व त्यामुळे त्यांना दु:ख होत असेल तर ते नाहीसे करण्याचे आश्वासन देऊन धैर्य धारण करावावे. रस्त्यातून येताना श्रम झाले असतील म्हणून त्याचे पादसंमर्दन करावे. रोगी असतील तर त्यांचा संयम भ्रष्ट न होईल अशा रीतीने काळजीपूर्वक आसन, शयया, जागा वगरे शुध्द करावी. जपून उठवावे, बसवावे, शयन करवावे व मनमूत्र विसर्जन करवावे. अबुध्दिपुर्वक मलमूत्र अयोग्य स्थानी अथवा रहम्याच्य जागी पडले ्सेल तर ते काढून निर्जीव जागी टकून दयावे. कफ, नाकातील मळ वगर पुसून तोही योग्य जागी टाकावा. आहार, औओषओध वगैं संयममी पुरुषांना योग्य असेल तर तो यग्य वेळी देऊन त्यांची वेदना नाहीशी करावी. समय पाहून योग्य व बाधारहित पदार्थ देणे, वेदनमुळे चित्त चचल झाले असेल तर, ते उपदेशाने स्थिर करणे, धर्मकथा ऐकविणे, तयांय मर्जीप्रमाणे वागणे, त्यांच्या गुणांचे स्तवन करणे वगरे त्यांच्या गुणाविषयी प्रीती ठेवून उपकार करणे हे सर्व वैयावृत्य होय.

### वैयावृत्यात मुख्य आहारदान

नवपुण्यै: प्रतिपत्ति: सप्तगुणसमाहितेन शुध्देन ।

अपसूनारम्भाणामार्यणामिष्यते दान्मम ।। ११३ ।।

अन्वयार्थ - (अपसूनारंभाणां) कांडणे, दळणे, चूल पेठिवणे, पाणी भरणे आणि केरसुणीने झाडणे याल पंचसूना म्हणतत. यांचा शेतकी व व्यापार यांचा ज्यांनी त्ाग केला आहे अशी (आर्यणां) मुनींचा, (सप्तगुणसमाहितेन) दताराचे सात गुण धारण करणाऱ्य श्रावकाने (शुध्देन) मन-वचन-कायशुध्दी ठेवून (नवपुण्यै:) नऊ प्रकारच्य भक्तींनी (प्रतिपत्ती:) सत्कार करणे (दानं इष्यते) दान म्हटले जाते.

विशेषार्थ - दान हे तीन प्रकारच्या पात्राला द्यावे. त्यातून ज्यंनी वर सांगितलेल्या पंचसूनांच तयाग केला ाहे व द्रव्योपार्जनादि सर्व आरंभाच्य त्याग केला आहे असे दिगंबर साधू हे उत्तम पात्र, होत. व्रत धारण करणारा श्रावक मध्यम पात्र आणि व्रतरहित पण सम्यक्त्व-युक्त श्रावक हे जघन्य पात्र आहे. उत्तम पात्राला दान देणाऱ्य श्रावकामध्ये सात गुण असावे लागतात. ते असे -

१) दाताराला इहलोकांसबंधी प्रसिध्दी, मान्यता, कीर्ती, राजमान्यता, धनधान्य वृध्दी वैगेर फलांची इच्छा नसावी.

२) दाताराला क्रोध नसावा, पुष्कळ मागणारे झाले आता कोणाकोणाला द्यावे असा विचार मनात न आणता मुनी व श्रावकंना दान द्यावे.

३)	कपट ठेवून त्याने दान करू  नये. कपट म्हणजे एक बोलून एक दाखवावयाचे व दुररेच करावयाचे. लोकांना वरबून मोठी भक्ती दाखवावयाची परंतु आतून दान देताना दु:ख वाटावयाचे अशी वृत्ती ठेवू नये.

४)	इतर दान देणाऱ्याशी ईर्ष्या करू न दान दू नयें. (( याने काय दान करावे, मी असे दान करीन की त्यापुढे याचे दान फिके पडेल(( असे विचार मनात आणणे याला ईर्षा म्हणतात.

५)	दान देऊन विषाद करू  नयें. म्हमजे काय करावे, माझी जगात मानमान्यता मोठी आहे. आता यावेळी जर मी दान देणार नाही तर लोकांत माझी मोठी अपकीर्ती होईल असे मनात णामून दान देऊ नये.

६)	मनात आनंद (मुदित भाव) मानून दान द्यावे. आज उत्तम, मध्यम वा जधन्य यापैकी कोणत्याही पात्राचा योग मिळून त्यांना विर्विघ्नपणे आहार मिळेल तर आपणाला अपूर्व निध प्राप्त झाल्यासारखे होईल असा विचार मनात आणून दान द्यावे.

७)	दान दिल्याचा अहंकार करू  नये. हा निरहंकारता नामक गुण आहे.

यांप्रमाणे पात्रदान करणाऱ्या श्रावकाचे हे सात गुण आहेत. ते श्रावकानेपाळवयास पाहिजे आहेत. पात्राला दान देणे ते, मुनि, श्रावक अथवा जशी त्याची योग्यता असेल त्याप्रमाणे भक्तिपूर्वक द्यावे. नवधा भक्ती येणे प्रमाणे-

१)	संग्रह अथवा प्रतिग्रह - मुनीश्वर अथवा क्षुल्लक यांना ((तिष्ठ तिष्ठ(( म्हणजे (उभे रहा( (उभे रहा( असे तीन वेळा म्हणावे. मुनि-क्षुल्लका खेरीज इतर कोणी श्रावक वगैरे योग्य पात्र आपल्या घरी आले तर त्याला (यावे, बसावे महाराज(, वगैरे आदराचे वचन उच्चारणे याला प्रतिग्रह वा संग्रह म्हणतात.

२)	उच्चस्थान देणे - आपल्या घरी आलेल्यास उच्च जागी (पाट, चौरंग यावर ) बसविणे.

३)	पादप्रक्षालन - शुध् पाण्याने मुनीश्वर अथवा क्षुल्लकांचे पाय धुणे.

४)	नमस्कार - मुनी अथवा श्रावक जे असतील त्यांच्या योग्यतेप्रमामे तक ांना नमस्कार करणे.

५)	पूजन - जशी वेळ जसे पात्र असेल त्याप्रमाणे त्याचे योग्य पूजन वा स्तवन करणे.

६)	मनशुध्दि - मनाची शुध्दता म्हणजे त्यावेळी वाईट विचार मनात न आणणे.

७)	वचनशुध्दि - वचनाची शुध्दता ठेवणे म्हणजे अयोग्य वचन मुखावाटे न उच्चारणे.

८)	कायशुध्दि - कायशुध्दि ठेवणे म्हणजे यत्नाचार पूर्वक चालणे, बसणे वगैरे क्रिया करणे.

९) आहारशुध्दि - भोजनशुध्दी ठेवणे म्हणजे पात्राला योग्य असे निर्दोष भोजन देणे. याला एषणाशुध्दी असेही म्हणतात.

याप्रमाणे जिनसूत्रानुसार पात्रांना योग्य व देशकालाला अनुसरू न आहार द्यावा. तो पात्राच्या गुणावर प्रीतीठेवून दिला तर सार्थक होतो, नाही तर निष्फल होतो. धर्मप्रिय माणसाची धर्मात्मा पुरुषावर प्रीती असते. मुनीश्वरांना या नवधा भक्तीमुले श्रावकाची परीक्षा होते. ज्याच्या मनात नवधा भक्ती नाही त्याला धर्म नाही, धर्मरहित असणाऱ्याच्या घरी मुनीश्वर कधीही आहार घेत नाहीत. याशिवाय इतर धर्मवान गृहस्थातदक देखील आदरातिथ्याने बोलिवल्याशिवाय धर्माचा निरादर करणाऱ्याच्या येथे दीनवृतती धारण करू न भोजन करीत नाहीत. दीनपणाचा त्याग व परम संतोष हीच जैनपणाची मोठी खूण आहे.

दाता असेल त्याने रागद्वेष उत्पन्न होणार नाही अशा तऱ्हेने आहार, औषध, शास्त्र, वसतिका, वस्त्र वगैरेचे दान द्यव. दान दणार्याने आपल्या द्रव्याचा योग्य स्थली उपयोग होती की नाही याचा विचार करावा ज्यमुळे मोह, काम आळस गर्व वगैरे विकार उत्पन्न होण्ाच संभव ्सेल असे पदार्थ दिल्याने संयमी पुरुषाच्य मनातील संक्लेश दूर होतात. ज्यापासून मोह, काम, आळस, चिंता, असंयम, भय, दु:ख, अभिमान वैगेर उत्पन्न होतील व गर्व वाढेल असे पदार्थ दान देण्यायोग्य नाहीत ज्यपासून स्वाध्याय, ध्यन तप संतोषादिकांची वृध्दी होईल असे अथवा जे देण्यापासून पात्राचे दु:ख नाहीसे होत असेल व परिणामातील संक्लेश दूर होत असेल असेच दान देणे योग्य आहे.

दानामध्ये दाता, देय, पात्र, विधि आणि काल असे पाच प्रकार आहेत. यातून दाता सात गुणांचा धारक असावा.

१) भक्ति त - पत्रातील गुण ग्रहण करण्याची बुध्दी असणे त्यासाठी प्रमाद न करता ज्ञान संपादन करावे व आपले परिणाम शांत ठेवण्याचा सतत प्रयत्न न करावा.

२) तुष्टि इ तुष्टि म्हणजे दान देण्याविषयी ज्याला अतिशय तळमळ वाटते त्याला पात्राचा संयोग मिळाला म्हणजे दरिद्री माणसाला अचानक धन प्राप्त झाल्याने जसा आनंद होतो तसा आनंद होणे अशा प्रकारच्या दातारातील गुणाला तुष्टिगुण म्हणतात.

३) श्रध्दा- संधूला दान देणे हेच हिपलोकी कल्याण करणारे आहे असा भरवसा असणे.

४) विज्ञान - द्रव्य, क्षेत्र, काल, भाव यांचा योग्य विचार करू न दान देणे.

५) अलोलुप - संसारासंबंधी धन, राज्य, ऐश्वर्य, विद्या, मंत्र, यश कीर्ती वैगैरे फलांची इच्छा न करणे.

६) सात्विक - श्रीमंत पुरुषालाही आश्चर्य उत्पन्न होण्यासारखे दान अल्प धन असणाऱ्या पुरुषाने देणे हा सात्विक गुण होय.

७) क्षमा - क्रोध उत्पन्न होण्याची कारणे येऊन पउाप्त झाली तरी गोणावरही रोष न करणे.

याशिवाय मुनी, श्रावक व अव्रतसम्यग्दृष्टि या तीन प्रकार्चया पात्राला दान देणाऱ्या उत्तम दाताराचे अनेक गुण आहेत. तो विनयवान म्हणजे नम्र असावा. उध्दटपणाने दिलेले दान निष्फळ होते. देम्याला जवळ काही नसले तरी फक्त विनय करमे हे देखील मोठे दान आहे. कोणाचाही सत्कार करणे, त्याशी मधुर भाषण करणे, येणाऱ्याला उच्चासनावर बसविणे, त्याच्या गुणांची स्तुती करणे, हे देखील मोठे दन आहे. धर्मावर प्रीती असणे, दानाच्या क्रमाचे ज्ञान असणे, दान कोणत्या वळी करमे योग्य आहे समजणे, जिनशास्त्राला जाणणे, विषयोपभोगांची इच्छा नसणे, सर्व जीवांवर दया करणे व करण्याचे विचार मनात असणे, रागद्वेषादिक मंद करीत जाणे, सारासार विचार करणे, समदर्शी होणे, इंद्रियांना जिंकणे, प्राप्त झालेल्या परीषहामुळे न भिणे, मत्सर उतपन्न न होऊ देणे, स्वमत परमताच ज्ञान असणे, प्रिय भाषण बोलणे, व्रती पुरषातील पवित्र गुणांनी मनाला संतुष्ट करणे, लोकव्यवहार व परमर्थ या दहोंना जाणणे, सम्यक्त्वगुण धारण करणे, अहंकारादि दुर्गुणांचा त्याग करणे, वैयोवृत्य करण्याविषयी तत्पर असणे असणे असे अनेक उत्तम गुण दातारात असणे हे तयाला भूषणावह आहे. तसेच त्यांच्य मनात सदैव पुढील विचार येतात (आपले द्रव्य व्रती पुरुषांच्या सेवेत खर्च व्हावे( सहधर्मी लोांवर उपकार करण्यात लागावे, ज्याला दु:ख प्राप्त झाले असेल ते निवारण करण्याचय कमीउयोगी पडवे, धर्मच्य वृध्दीकडे त्यचा उपयोग व्हावा, अशा सन्मार्गाकडे उपयगी पडेल तेच मझे द्रव्य. इतरसांसारिक कार्यात अथवा कुटंबीजनांच्य विषयपोषणा४थ जे धन खर्च होईल ते केवळ बंध करण्यास कारण होऊन त्यापासून अनंतकाल संसारसमुद्रात फिरावे लागेल. कुटंबातील माणसे जी मझ्य धनाचा उपयोग घेत आहेत त्यांचा मी ऋणी (कर्जदार) आहे. ते धन वाटून घेणारे व जबरीने लुटून नेणारे असून रागद्वेषादि कषाय उत्पन्न करू न वउत संयमाचा घात करणारे आहेत. मला पापाची प्रेरमा करमारे आहेत. मीही त्यांचया संयगाने अशा जबदस्त अज्ञानांधरकाराचय छायेत सपडलो आहे. त्यांचयवरील खोट्या प्रेमाला बळी पडून मलाही धर्म, अधर्म, न्यय, अन्य, यश अपयश ही मुलीच दिसेनाशी झाली आहेत. स्त्री-पुत्रादिकांच्या विषयांची पुष्टी करण्याकरित इतर दुर्बल भोळ्या अज्ञानी जीवांपासून द्रव्य ठगवून वा लुटून घ्यावे अस मला नेहमी वाटू लागते. कुटंबला धवस्त्राभपण- भोजनादिकांच्या योगे तृप्त करण्याकरिता रात्रंदिवस खोटे बोलणे, चोरी करणे वगैरे कृत्य करण्याचे इच्छा होते. आता भगवान वीतरागदेवांनी उपदेशिलेल्या धर्माची प्राप्ती झाली आहे. त्याअर्थी कुटंबपोषमाकरिता अथवा धनोपार्जन करण्याकरिता मी अन्यय व अनीतीमध्ये प्रवृत्त होणार नाही. न्याय मार्गाने ज प्राप्त होईल तेवढ्यात उपजीविका करीन. धन, यौवन व आयुष्य ही क्षणभंगुर आहेत. एक दिवस निश्चयने मरण प्राप्त होणार ाहे व ते अचानक प्राप्त होईल, त्यावेळी धनसंपदा, कुटुंबातल माणसे वगरे कोणीही बरोबर येणार नाहीत. फक्त मी उपार्जन केलेले दान, तप शील, भावना यपासून उत्पन्न केलेले पुण्य हेच परलोकी सहाय करण्ास मजबरोबर यईल. याठिकणी जी समग्री प्राप्त झालेली आहे ती सर्व पूर्वजन्मात दान दिले तयाच फळ आहे. आता दान देण्यात, धर्मवान पुरुषांची सेवा करण्यात, तदु:खित बुभुक्षितांवर उपकार करण्यत जर मी प्रवृत्त होईन तर परलोकी सर्व सुखांची व मोक्षमार्गाची समयग्ज्ञानौदि साम्रगी प्राप्त होईल.

आदी पात्रदान देऊ नंतर जे स्वत: भोजन करतील त्यांचे जिणे सफल समजावे. एरवी पशू देखील आपले पोट भरत असतात. ज्याच्या घरी पात्रदान दिले जाते तेच खरे घर महणावे. पशूंना रहण्यास बिळे पक्षयांना राहण्यस घरटी असतात मग मनुष्यां घरात व पशूबंच्या बिळात अंतर ते काय ( समुद्रात पाणी व रत्ने पुष्कळ आहेत. परंतु पाणी हे अतिशय खारट व रत्ने महामत्स्यादि प्राण्यांनी व्‍ापिलेली आहेत. तयअर्थी ती विपुल असून काय उपयोगाची ( अर्थात् ती विपुल असूनही जशी निष्फळ तद्वत ज्या गृहस्थापाशी पुष्कळ धन असून त्याचा जर आपल्या समानधर्मीय लोकांच्या व दीन अनाथ लोकांच्या सतकार्यार्थ ुपयग होत नसल तर ते धन विपुल असूनही काय करावयाचे( ते निष्फळच म्हटले जाईल. ते त्याचे मालकीचे नाही ते दुसऱ्य कोणा तरी पुण्यवान् जीवाच्या उपयोगी पडणार आहे. हा फक्त त्याचा रक्षक आहे. रात्रंदिवस ते कोणी नेत आहे की काय याची चौकशी करणारा आहे. ज्याच्या घरी सुदैवाने सत्पात्र प्राप्त झाले असता देण्याची सामग्री तयार असूनही देवत नाही त्याच्य हाती चिंतामणि रत्न प्राप्त होऊन ते नष्ट झाल्यासारखे आहे. द्रव्य प्राप्त झाले असून जो त्याच्या व्यय पात्रदानाकडे करीत नाही तो मूर्ख आपलय आत्म्याला ठकवीत आहे असे समजावे. जो आपले द्रव्य दान करण्याकड लावतो तोच स्वामी समजावा. ज्यच परिणाम नेहमी सत्पात्राला दान देण्‍ाविषयी उद्युक्त असतात. तयां दान देण्‍ाचा प्रत्यक्ष संयोग प्राप्त झाला नाही तरी ते निरंतर दान करीत आहेत असे समजावे. द्रव् अगदी थोडे अथवा पुष्कळ ्सूनही ज अतिशय भक्तीने दान देतात तेच दातार होत जयंना भक्ती नाही ते दातार नव्हेत. वेळ सोडून अकाली जे दान करतात त्यांचे दान अकाली पेरलेल्या बीजप्रमाणे निष्फल होते. जे अपात्राला दान देतात त्‍ांचे दान खारट भूमीत पेरलेल्य बीजाप्रमाणे निरर्थक होते. दुष्ट पुरुषाला दिलेला दान सर्पाला पाजलेल्या शर्करामिश्रित गोड दुधापासून उत्पन्न होणाऱ्या विषाप्रमाणे संसारात घोर दु:ख, मरण व संताप देणारे होते. आपल्या नशिबानुसार जेवढे धन मिळेल तेढ्यातून दानाचा विभाग करून ते खर्चीत जावे. त्यावेळी मनात असा विचार करू नये की मजजवळ अधिक धन असते तर मी अधिक खर्चिले ्सते. दानाकरिता अभिमान धरून अधिक धनाची इच्छा करू नयै. आपल्य लाभांतराय कर्माच्या क्षायोपशमापासून मिळेल तेवढ्यात संतोष मानणे व अधिक न इच्छिले हेही मोठे दान आहे. न्‍ायाने जे द्रव्य मिळिवले असेल त्यातून काही याचकांना देण्यात उपयोगी पडले व गृहखर्चात व देण्यघेण्यात जर त्‍ा द्रव्यांपासून उपयोग झाला तर ते कमविणे सफल झाले, असे परिणाम दाताराचे नेहमी असावेत. जे दान द्यावयचे ते आनंदाने द्यवे. ते क्रोध करून दिले, अपमान करून दिले, तिरस्कार करून दिले व दूषण ठेवून दिले तर त्‍ापासून देणाऱ्याची जगात अपकीर्ती होते व कलह उत्पन्न होतो. परलोकी अशुभ कर्माचे फल दारिद्र व अपमान वगैरे अनेक जन्मापर्यंत भोगावे लागते.

जे देण्यायोग्य नाही असे दान देणे याला कुदान म्हणतात ते देणे योग्य नाही. भूमिदान करू नये. कारण नांगर, फाळा, खोऱ्या, कुदळ यांनी नेहमी खोदली जाते. त्यावेळी ्नंत जीवांची हिंसा होते. मोठमोठे पंचेद्रिंय जीव, सर्व उंदीर वगैरे प्राणी धान्य फळादिकांचा नाश करणारे आहेत महणून मरावे लागतात. जमिनीवर प्रमामुळे भाऊ भाऊ परस्पर लढून प्राणास मुकतात. अशा तीव्र रागद्वेषाला उत्पन्न करणाऱ्या भूदानाला घोर पापबंधाचे कारण जाणून ते करू नये. ज्यंपासून तीव्र हिंसा उतपन्न होत असे लोखंड दान देऊ नये. याचप्रमाणे सुवर्णदानही करू नये. यापासून पात्र म्हणज घेणाऱ्याचा नाश होतो,

तो मारला जातो, त्याला सदैव भीती असते, सूवर्णदानापासून संयमाचा नाश होतो. राग, द्वेष, काम, क्रोध, लोभ, भय, मद, मत्सर वगैरे वरचेवर अधिक प्रमाणात उत्पन्न होतात. आत्मस्वरू पाचा विसर पडतो. त्याअर्थी वीतराग धर्माची इच्छा करणाऱ्या पुरुषांनी सुवर्णदान पाप आहे असे समजून ते देऊ नये. कोट्यावधि त्रस जीवांच्या उत्पत्तीला कारण अशा तिळाचे दान करू नये. जाते, चूल, केरसुणी, मुसळ, खोऱ्या, मोड आलेल्या धान्, तेल, दिवा, गूळ, उसाचा रस इत्यादि पदार्थ तयार करण्यात अनेक जीवांची हिंसा होऊन त्यावर अत्यंत मोह उत्पन्न होतो. हे पदार्थ देण्याने धर्म घडतो अशा विचाराने मिथ्यामार्गी लोक दान देतात. पण या सर्वांना कुदान म्हटले आहे. हे संसाराचे बंधन वढविणारे आहे. कन्येचे दान हेही कुदान आहे. यावर कोणी म्हणेल की, गृहस्थाला कन्यादान दिल्यावाचून कसे चालेल( हे खरे. गृहस्थाने आपल्या कन्याचा विवाह योग्य कुलात उत्पन्न झालेल्या जिनधर्मी, व्यवहारचतुर व गुणसंपन्न वराला पाहून करावा. परंतु कन्यादान करण्यात धर्म घडतो अशी कल्पना करू नये. जैन लोक कन्यादानाला पाप मानतात. जसे गृहकर्मे आरंभादि करण्यात अनेक पापांची उत्पत्ती होते तशीच कन्यादानातही घडते. पण यो पाप फार मोठे प्रायश्चित घेण्याने नाहीसे होणार आहे. इतर लोक कन्यादान देण्याने फार पुण्य प्राप्त होते असे मानतात. ते कन्यादानाला लक्षा यज्ञ केल्याचे फल प्राप्त होते व कोट्यावधि ब्राह्मणांना भोजन करविण्याहून व कोटी गाईचे दान देण्याहूनही अधिक फल प्राप्त होते असे म्हणतात. पण जैन याला संसार-परिभ्रमण करविणारे कुदान म्हणतात. याशिवाय अनेक संसारसमुद्रात बुडविणारी मिथ्यादृष्टि, लभी, विषयलंपटी लोकांनी वर्णिलेली कुदाने आहेत. ती सर्व जैन गृहस्थाने देऊ नयेत, त्यापैकी कांहींची उदाहरणे पुढे दिली आहेत.

सोन्याची गाय, रुप्याची गाय, तिळाची गाय, तुपाची गाय तयार करून कित्येक दान करीत असतात. हे दान घेणारा या तुपाच्या व तिळाच्या गाई खातो, सुवर्ण रुप्याच्या गाई तोडून भट्टीत घालून आटवितो. गाईच्या शेपटीत तेहतीस कोटी देवता व अडुसष्ट तीर्थ आहेत असे ब्राह्मण प्रतिपादन करतात. मिथ्याधर्मी लोक दासदासीचे दान करीत असतात. संक्रांत ग्रहण, व्यतिपात वगैरे दिवशी दान देतत. हे सर्व मिथ्यात्व आहे. मेलेल्या माणसाच्या तृप्तीकरिता ब्राह्मण-भोजन करवितात. ब्राह्मणांना जेवू घातल्याने मेलेल्या माणसाची तृप्ती कशी होते( दान मुलाने द्यावे व बाप पापापासून मुक्त व्हावा हे आश्चर्य आहे. पुष्कळ दिवसापूर्वी मरण पावलेल्या माणसांची हाडे गंगेत नेऊन टाकल्याने मरणाऱ्याला मोक्षा प्रापत् होतो म्हणून मानतात. गंगेत जाऊन श्राद्धा केल्याने एकवीस पिढ्यांचा उद्धार होतो. गंगेत पिंडदान केल्याने द्हा पिढ्या पहिल्या व दहा पिढ्या मागल्या व एक आपण अशा एकवीस पिढ्या संसारात कुगतीत पडलेल्या निघून वैकुंठात जाऊन राहतात. पहिल्यांदा मुला-नातवांनी व त्यांच्या संतानांनी हवे तेव्ढे पाप केलेले असो, गंगेला जाऊन श्राद्ध केले म्हणजे एकवीस पिढ्यासुद्धा सर्वांची मुक्ती होते म्हणून कोणीही पापाची भीति बाघवण्याचे कारण नाही असे वर्ण इतर लोकांच्या ग्रंथातून आढळते. श्राद्धात ब्राह्मणांना मांसपिंडाचे भोजन करवितात. मांसाने देवदेवतांची तृप्ती होते, दुर्गा, भवानी वगैरे देवी जीवांचे, राक्षसांचे व पशूंचे रक्त प्राशन केल्याने तृप्त होतात. देवतेला बकरे, हाले वगैरे कापून बलिदान करतात. याप्रमाणे अनेक पापकर्मे करण्यात धर्म घडतो अशी लोकांची खोटी समजूत घालतात पापी लोकांनी खोटी शास्त्रे रचिली व मांस भक्षाणासारखे महान् घोर कर्म करून ते स्वत: नरक-मार्गी झ

ाले व दुसऱ्यांनाही नरक मार्गानुगामी केले. सारांश, जिव्हेन्द्रियास लोलुप झाल्याने कोणतेही घोर कर् करण्याचे बाकी ठेवले नाही. पापी लोकांनी मनुष्यजन्मात येऊनही कोल्हे, कुत्रे, वाघासारखे दुष्ट आचरण केले आहे. ज्यांच्या शास्त्रात अशा भयंकर पाप उत्पन्न होण्यासारख्या गोष्टी वर्णिल्या आहेत म्हणून त्यांच्या व म्लेंच्छांच्या धर्मात काही फरक नाही. ही अक्षरे म्लेच्छांची आहेत ती वेदातीत असे अज्ञानी लोकांनी भासवून शिकार करण्यात धर्म आहे असे प्रतिपादन केले. ज्यांचे देव गळ्यात मंडमाला घालून मांस व रुधिर भक्षण करतात त्यांची सेवा करणाऱ्या पाप्यांचे किती वर्णन करावे( अशा कुपात्रांना दान देण्यापासून भयंकर दु:ख उतपनन झाल्यावाचून राहणार नाही. कुदान देण्यापासून व घेण्यापासून नरक तिर्यंचामध्ये पुष्कळ वेळा जन्म मरण करावे लागून पुन: निगोदात, एकेन्द्रियात, द्वीन्द्रियात अनंतकालपर्यंत असंख्यात परावर्तने करावे लागतील, असे जाणून कुदान करण्यास प्रवृत्त होऊ नये.

आता पहिल्या श्लोकात वर्णिल्याप्रमाणे दान दिल्यास त्याचे काय फल प्राप्त होते ते दाखवितात.

सद्दानाचे फल

गृहकर्मणापि निचित्तं कर्म विमार्ष्टि खलु गृहविमुक्तानाम्।

अतिथीनां प्रतिपूजा रुधिरमलं धावते वारि।। ११४।।

अन्वयार्थ - (गृहविमुक्तानां अतिथीनां) गृहरहित जे अतिथी म्हणजे मुनी, त्यांची (प्रतिपूज) प्रतिपूजा म्हणजे दान, सम्मान, उपासनादि करणे (गृहकर्मणा अपि निचितं कर्म) हे गृहस्थाने षट्कर्मापासून उपार्जन केलेल्या पापकर्मरूपमलाला (वारि रुधिरं अलं धावते) पामी रक्ताचा डाग पूर्णपणे नाहीसे करत त्याप्रमाणे (विमार्ष्टि) नाहीसे करते.

भावार्थ - गृहस्थाला नेहमी आरंभादिकांच्या योगाने पापोपार्जन होत असते. ते पाप नाहीसे करण्यास मुनीश्वरांना दिलेले दान हेच समर्थ आहे. अंगाला रक्ताचा डाग पडला तर तो रक्तानेच धुतला असता जात नाही, तो पाण्याने धुतला जातो. तसे गृहाचारात आरंभापासून उत्पन्न झालेले पाप हे गृहत्यागी साधूंना दान देण्यानेच नाहीसे होते.

दानाचा प्रभाव

उच्चैर्गोत्रं प्रणतेर्भोगो दानादुपासनात्पूजा।

भक्ते: सुन्दररूपं स्तवनात्कीर्तिस्तपोनिधिषु।। ११५।।

अन्वयार्थ - (तपोनिधिषु) तपस्वी मुनीला (प्रणते:) नमस्कार केल्याने (उच्चै: गोत्रं) उच्च गोत्र प्राप्त होते. (दानात् भोग:) त्यांना दान दिल्याने भोगभूमीचे सुख मिळते. (उपासनात् पूजा) त्यांची उपासना केल्याने आपली पूजा होते, (भक्ते: सुंदररूपं) त्यांची भक्ती केल्याने सुंदर स्वरूप प्राप्त होते आणि (स्तवनात् कीर्ति:) त्यांची स्तुती केल्याने आपली कीर्ती होते.

भावार्थ - तपोनिधान, परमशांत भावाला धारण करणारे, बावीस परीषह सहन करणारे, आपल्या देहाविषयी ममत्व न ठेवणारे, पंचेंद्रियांच्या विषयापासून अत्यंत विरक्त, अभिमान-कषायरहित, आत्मविशुद्धीची इच्छा करणारे असे जे उत्तम पात्र मुनी त्यांना नमस्कार केल्याने उच्चगोत्र म्हणजे स्वर्गलोकी जन्म व तेथून तीर्तंकरकुलात जन्म किंवा चक्रवर्तीच्या कुलात जन्म प्रापत् होऊन क्रमाने सर्वोत्कृष्ट सिद्धपदाची प्रापती होते. उत्तम पात्राला दान दिल्याने भोगभूमीचे भोग वा देवलोकातील भोग, राज्यवैभवाचे भोग, अहमिंद्रपदातील भोग प्राप्त होऊन पुं तीर्थंकरचक्रवर्तिपद प्रापत् होते. क्रमाने निर्वाणातील अनंत सुख प्राप्त होते. साधूंची उपासना म्हणजे सेवा केल्याने त्रेलोक्यपूज्य केवलीचे पद प्राप्त होते. त्यांची भक्ति केल्याने सुंदर रूप प्राप्त होते.

दानाचा प्रभाव

क्षितिगतमिव वटबीजं पात्रगतं दानमल्पमपि काले।

फलति च्छायाविभवं बहुफलमिष्टं शरीरभृतातम्।। ११६।।

अन्वयार्थ - (काले) योग्यवेळी (पात्रगतं) सत्पात्राला दिलेले (अल्पं अपि दानं) थोडे देखील दान (क्षितिगतं वटबीजं इव) चांगल्या जमिनीत पेरलेल्या, वडाच्या बीजाप्रमाणे (शरीरभृतां) प्राणिमात्रांना (छायाविभवं) छायेप्रमाणे माहात्म्य, ऐश्वर्य व वैभव वगैरे भोगोपभोगांच्या संपत्तिरूपाने (इष्टं बहुफलं फलति) फार मोठे इष्ट फल देते सत्पात्र-दानाचे अचितन्त्य फल आहे. याच्या प्रभावाने सम्यक्त्व ग्रहण होते. सम्यक्त्व नसणारा मिथ्यादृष्टि देखील सत्पात्रदानाच्या उत्तम भोगभूमीत जन्म घेतो. भोगभूमीत तीन पल्याचे आयुष्य, तीन कोस उंचीचे शरीर, समचतुरस्र संस्थान, (अत्यंत सुंदर शरीर) महान् बल, अतुल पराक्रम वगैरे गुणांची प्राप्ती होते. त्याठिकाणी स्त्री-पुरुषांची जोडी (युगल) एकदम उत्पन्न होते. तीन दिवस गेल्यानंतर आहाराची इच्छा उत्पन्न झाली तर बोराएवढा आहार घेतल्याने त्यांच्या क्षुधेची शांती होते. दहा जातीच्या कल्पवृक्षापासून त्यांना मनोवांछित भोगांची सामग्री प्राप्त होते. तेथे तृष्णेची बाधा मुळीच होत नाही. ऊन किंवा पाऊस या दोहोंचाही त्रास नाही, दिवस रात्रीचा भेद नाही. नेहमी प्रकाश असायचा. शीतल, मंद, सुगंध असा वारा नेहमी वाहत असावयाचा. तेथील मिनीवर खडे, दगड, गवत, काटे, चिखल वगैरे मुळीच नसतो. मीन स्फटिकमण्यासारकी निर्मळ असते. यावज्जीव शरीराला रोग होत नाही. म्हातारपण नाही. दुसरे कोणतेही दुःख नाही. तेथे सेव्य सेवकभाव नाही. परचक्राची भीती नाही. षट्कर्म करून उपीविका करावी लागत नाही. तेथे दहा प्रकारचे कल्पवृक्ष आहेत. ते असे-

१) तूर्यांग तीच्या कल्पवृक्षापासून वीणा, बासरी, सतार, मृदंग वगैरे कर्णमधुर वाद्यांची प्राप्ती होते.

२) पात्रांग तीचे कल्पवृक्ष रत्नाची, सोन्याची वगैरे अनेक प्रकारची नाणी, उपकरणे दर्पण, झारी, आसन, पलंग, देतात.

३) भूषणांग जातीचे कल्पवृक्ष अनेक प्रकारची आभूषणे पुरवितात. शरीराला शोभविणारी रत्नडित कुण्डले, बिघबाळया, हार, कंठे, कडे, साकळे व इतर सर्व अलंकारांना आभूषणे म्हणतात.

४) पानांग जातीच्या कल्पवृक्षापासुन पिण्यायोग्य असे मधूर सुवासाने भरलेले पाणी व इतरपदार्थ प्राप्त होतात.

५) आहारांग जातीचे कल्पवृक्ष अनेक प्रकारचे स्वादिष्ट भोजन तयार आणून देतात पण क्षुधेची पीडा नसल्यामुळे त्याची विशेष जरूरी पडत नाही. रोगावाचून औषध कोण ग्रहण करील( भोगभूमीत जन्म घेणाऱ्यांना भुधेची वेदना नसते. ते तीन दिवसानंतर बोरा एवढा आहार घेतात.

६) गृहांग कल्पवृक्षापासून अनेक प्रकारच्या रत्नांची घरे, प्रसाद प्राप्त होतात.

७) पुष्पांग जातीच्या कल्पवृक्षापासून नाना प्रकारच्या कोमल व सुगंधी फुलांच्या आभूषणांची प्रापती होते.

८) ज्योतिरंग जातीचे कल्पवृक्ष आपल्या प्रकाशापुढे सूर्यचंद्राचा प्रकाश पडू देत नाहीत. सूर्यप्रकाशापेक्षा यांचा अधिक प्रकाश असतो म्हणून तेथे दिवस व रात्रीचा भेद राहत नाही.

९) वस्त्राग जातीच्या कल्पवृक्षापासून नाना प्रकारची मनोवाञ्छित सुंदर वस्त्रे, शय्या, आसन, बिछायती वगैरे प्राप्त होतात.

१०) दीपांग - दीपांगजातीचे कल्पवृक्ष दीपावलीची शोभा देतात.

भोगभूमीत स्त्री-पुरुषाच्या जोडीला मरणसमयी पुरुषाला शिंक व स्त्रीला जांभई येते. त्यावेळी त्यांना एक युगल म्हणजे एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये एकदम प्रापत होतात. आपल्या मुलाला पाहण्यास माता -पित्याचे युगल जीवंत राहत नाही व मुले ही आपल्या माता-पित्यांना पाहत नाहीत. म्हणून यांना वियोग दु:ख नाही. मरणानंतर त्यांचा देह शरदऋतूतील मेघाप्रमाणए विखरून जातो. युगल उत्पन्न झाल्यानंतर सात दिवसार्यंत ते आपले अगुंष्ठ चोखते. पुढे सात दिवस खआली उलथे-पालथे होत असते. पुढे सात दिवसात अस्थिर असे गमन करते. पुढे सात दिवासनंतर पूर्णय योवन प्राप्त होते. यानंतर सातदिवसात सर्व शास्त्रकला-चातुर्यात निपुणता प्राप्त होते. यप्रमाणे एकोनपन्नास दिवसात ते परिपूर्ण बनते. अनेक प्रकारच्या पृथक् व अपृथक् विक्रियांनी नाना प्रकारच्या मंदिरात विहार करीत प्रतिक्षणी अनेक प्रकारच्या नवीन नवीन प्राप्त होणाऱ्या भोगसामग्रीचा ते उपभोग घेतात. अनेक क्रीडा, रागरंग वगैरे प्रकारच्या विलासक्रियेत तीन पल्य आयुष्य पऊर्ण करून मरणसमयी शिंक व जांभाईच्या निमित्ताने प्राणत्याग करतात. ते युगल सम्यग्दृष्टि असेल तर सौधर्म व ऐशान स्वर्गात उत्पन्न होते व मिथ्यादृष्टि असेल तर मरणोत्तर भवनवासी, व्यंतर, जयोतिष देवामध्ये उत्पन्न होते. कषायाचा प्रभाव मंद असल्यामुळे देवगतीशिवाय दुसरी गती त्यांना प्राप्त होत नाही.

सम्यग्दृष्टि असून श्रावकांची व्रते धारण करणारा असेल व त्याने सत्पात्र दान केले असेल तर तो सोळाव्या स्वर्गापासून महर्धिक देव होऊनच जन्म घेतो. शास्त्रात पात्राचे उत्तम, मध्यम आणि जघन्य असे तीन भेद सांगितले आहेत. त्यातून महाव्रत धारण करून अठ्ठावीस मूलगुण व उत्तरगुण पाळणार्या निर्ममत्वी वीतरागी साधूला उत्तम पात्र म्हटले आहे. अकरा प्रतिमाधारी सम्यग्दृष्टि श्रावक व स्त्रीपर्यायात आपल्या मर्यादेप्रमाणए व्रत धारण करणारी स्त्री, एक वस्त्राशिवाय एक परिग्रहाचा त्याग करून दुसर्‍याच्या घरी एकवेळा याचना न करता मौन धारण करून भिक्षा भोजन करणारी अर्जिकेच्या समूहात राहून धर्मध्यान करीत महान तपश्चरण करणारी अर्जिका व अणुव्रते व सम्यग्दर्शन धारण करणारी श्राविका ही मध्यम पात्र जाणावी. व्रतरहित पण जिनेंन्द्राच्या वचनावर भरवसा ठेवणारे सम्यग्दर्शन युक्त पुरुष व स्त्री जघन्यपात्र होत. या तीन पात्रांना चार प्रकारचे दान देणे, त्यांचे आदरातिथ्य करणे, उच्चस्थान देणे, त्यांचे यथायोग्य स्तवन पूजन करणे, प्रशंसापर वचन बोलणे, उठून उभे राहणे, उच्च मानणे वगैरे सर्व क्रियांचा दानात अंतर्भाव होतो.

चार प्रकारचे दान

आहारौषधयोरप्युपकरणावासयोश्च दानेन ।

वैयावृत्यं ब्रुवते चतुरात्मत्वेन चतुरस्त्रा: ।।११७।।

विशेषार्थ - (चतुरस्त्रा:) चतुरस्त्र म्हणजे प्रवीण असे नांव अचार्य (वैयावृत्यं) वैयावृत्त्याचे (आहारौषधयौ:) आहारदान, औषधदान(अपि) आणि (उपकरणावासयो: दानेन) उपकरणदान, वसतिकादान (चतुरात्मत्वेन ब्रुवते) असे चार भेद सांगतात.

भावार्थ - गृहस्थआंना चार प्रकारचे दान करण्यास आचार्यांनी सांगितले आहे. अभयदान मुख्यत्वे करून षट्कायजीवांचा कृत-कारित-अनुमोदनांनी विराधन करण्याचा त्याग केल्याने ते अंशत: घडते, पण विशेषत: आरंभत्याग ज्यांनी केला आहे अशा दिगंबर यतींना घडते. श्रावकालाही त्रसजीवाच्या संकल्पी हिंसेचा त्याग व विषयापासून पराङ्मुखता झाल्याने होते. याप्रमाणे गृहस्थाने आपला आचार, विचार, संपत्ती, ऐश्वर्य वगैरे पाहून व न्यायरूपाने प्राप्त होणार्या विषयोपभोग त्यागता येत नाहीत तोपर्यंत आहारादि चार प्रकारचे दान करून पापाचा नाश करीत रहावे.

संपत्ती, आयुष्य शरीर वगैरे अस्थिर आहे, म्हणून दान केल्याने गृहस्थपूज्य होतो. गृहस्थपणा प्राप्त होऊन दान केले नाही व सदैव पापारंभ करीत राहिले तर तो गृहस्थपणा आरंभाच्या भाराने पाषाणाच्या नावेसारखा संसारसमुद्रात बुडविणारा होतो. ज्ञानी पुरुष असे चिंतन करतात की, (मी जे हे द्रव्य उपार्जन केले आहेअथवा माझ्या वडिलांनी मजकरिता मिळवून ठेवलेले जे मला अनायासे प्राप्त झाले आहे, अथवा राज्य, ऐश्वर्य, देश नगर, वस्त्राभरण, सेवकसमूह वगैरे सामग्री काहीही श्रम न करता प्राप्त झाली आहे, ती सर्व पूर्वजन्मी दिलेल्या दानाचे म्हणजे दु:खितांचे पालनपोषण केल्याचे फल आहे. मी पूर्वी दुसर्‍याचे धन हरण करावे असा स्वप्तनात देखील मनात विचार आणला नाही. त्यांना जे प्राप्त झ

ााले तेव्हा अयात संतोष धारण करू न विषयापासून विरक्त होऊन निर्वाछकता धारण केली त्याचे फल आहे. अथवा दीन, दु:ऋखित असहायी, रोगी, बाल, वृध्दयाजवर दया करू न उपरकार केला, त्याचे फल म्हणून ही संपदा प्राप्त झाली आहे हिचा संयोगन अल्पकाल राहणार आहे. ही संपत्ती परलोकी जम बरोबर येणारी नाही. ती जमिनीत पुरलेल्या ठिकाणीच राहील, अथवा दुसऱ्या कोठे ठेवली असेल तेथेच राहील. दुसऱ्या कोणाजवळ ठेवरू पाने ठवली असेल तर ती तेथेच राहून जाईल अथवा त्या संपत्तीचे स्त्री, पुत्र, कुटुंब वगैरे जे कोणी हक्कदार असतील ते मालक होतील.यतिचा कोणी वारस न मिळाला तर राजा नेईल. हिचा संबंध जर सोडला तर मी मात्र अचानक मरू न दुर्गतीला जाईल. मी हे धन अनेक प्रकारचे कपट करू न , महान पापारंभ करू न देशिवदेशात परिभ्रमण करू न अथिशय कष्टाने संपादन कले असून प्राणापेक्षाही अधिक याचे रक्षण केले आहे. आता उपभोग न घेता मरावे लागणार आहे.

शहाण्या पुरुषाने वरील विचार मनात आणू नये. जगाच्या रहाटीकडे पहावे. लाखो रुपयांचे धन जवळ आहे त्यांना तरी त्याचा उपभोग मिळतो काय उपभोग तर शेर पावशेर अन्नाचा मिळणार( पण धन-तृष्णा फार मोठी असते. त्यामुळे आपले धन कोणत्या उपयाांनी वाढेल याच्या विचाराने त्याला रात्रंदिवस चैन पडत नाही. दुसऱ्याजवळ पाहता पहता पन्नास लाखाचे धन झाले व मजजवळ अवघे पाच लाखच( आता काय करावे( आपले धन कसे वाढवावे( काय उपाय करावा( कोणता व्यापार करावा( कोणत्या राजाचे मन प्रसन्न करावे( कोणाशी मैत्री करावी की ज्याच्या सल्ल्याने माझे धन तत्काल वृध्दी पावेल अथवा ्सा एखादा नौकर मिळावा की त्यान थोडा पगार घेऊन माझे धन दुप्पट करू न द्यावे. याप्रमाणे हजारो प्रकारचे विकल्प करीत संसारी जीव प्रापत झालेल्या सर्व संपत्तीचा व ऐश्वर्याचा भोग न घेता रात्ंदिवस आर्तपरिणामाने तळमळ करीत मरण पावतो न नरकातील भयंकर पापाचा भोक्त होतो. संसारात अनंत दु:ख भोगून परिभ्रमण करीत व क्षुधा, तृषा, रोग, दारिद्राचा उपभोग घेत घेत त्याचा अनंतकाल लोटतो. या निकृष्ट कालात कदाचित कोणाला मोहरूपी निद्रेचा उपशम होण्याने जिनवचनावर भरवसा बसला तर त्याच्या प्रभावाने जागृत होऊन आपल्या हिताचे चिंतन केले तर चार प्रकारचे दान करावे अशी त्याला बुध्दी होते.

सर्व दानात आहारदान हे श्रेष्ठ आहे कारण हा जीव आहारदानाने जगतो. कोट्यवधि रुपयांचे सुवर्णदान केले तरी त्याची आहारदानाशी बरोबरी होणार नाही. आहापापासूनच देह टिकतो. देह असेल तर रत्नत्रय-धर्माचे पालन होते. रत्नत्रय-धर्मापासून निर्वाण प्राप्त होतो. निवाणात अनंत सुख आहे म्हणून निर्वाछक साधूवर उपकार झाल तर फक्त आहारदापासून होतो साधु आहारा-शिवाय दुसरी कोणतीही तिलथुषमात्र वस्तू ग्रहण करीत नाही. आहारा-शिवाय शरीर टिकत नाही. आहार नसेल तर शरीरात अनेक रोग उत्पन्न होतात. आहाराशिवाय व्रत, संयम, तप यापैकी एकही पाळता येत नाही. आहारावाचून परमागमाचा उपदेशही करता येत नाही. आहरावाचून उपदेशग्रहणाची ताकद राहत नाही. आरहाराशिवाय शरीराची कांती राहात नाही. आहारावाचून क्षमा, शांति, नीति, रति, उक्ति, शक्ति, द्युति, प्रीति, प्रतीति वगैरेसर्व नाहीशा होतात. आहाराशिवाय समभाव, इंद्रियमदमन, जीवदया, मुनिश्रावकाचा धर्म, विनयप्रवृत्ती, तप:प्रवृत्ती, यश:प्रवृत्ती वगैरे सर्वाचा नाश होतो. आहाराशिवाय वचनप्राविण्य नाहीसे

होते. आहाराशिवाय शरीराचा वर्ण बिघडून जातो. शरीराचा मुखाची दुर्गंधी येऊ लागते. आहारावाचून शरीर जीर्ण होऊन जाते. आहारावाचून सर्व शरीराच्या चेष्टा (व्यापार) नष्ट होतातत. आहार न मिळाला तर कित्येक लोक आपल्या प्राणप्रिय पुत्रपुत्री व प्रसंगी स्त्रीला देखील विकतात. आहार नसेल तर डोळ्याला अंधारी येते. कान बहिरे होतात, नाकाला वास येत नाही, स्पर्श समजत नाही. आहार नसेल तर मनुष्याची हालचाल नाहीशी होऊन तो म्ढ च्यासारखा निश्चेष्ट होतो. आहार नसेल तर प्राण नाहीसा होतो. आहार नसेल तर चिंता, शोक भय,क लेश, संताप वगैरे उत्पन्न होतात. आहार न मिळाला तर दीन अवस्था होते. दैन्य प्राप्त झालेल्या माणासाचा जगात फार अपमान होतो. याप्रमाणे घोर दु:ख व दुर्ध्यान नाहीसे करणारे आहारदान ज्याने दिले त्याने व्रससंयम वगैरे सर्वांचे रूाण केले. फार काय त्याने सर्व रोग देखील नाहीसे केले असे म्हटले तरी चालेल. म्हणून आहारदानासारखा उपकार दुसरा कोणताही नाही.

दुसरे औषधदान हे सर्व रोगांचा नाश करणारे आहे म्हणून श्रेष्ठ आहे. रोगाने व्रतसंयमाचा बिघाड होतो स्वाध्याय, ध्यान वगैरे सर्व धर्मकार्याचा लोप होतो. रोगी पुरुषाला सामायिकादि आवश्यक क्रिया होऊ शकत नाहीत. रोगामुळे नेहमी आर्तध्यान घडते व त्यामुळे मरण बिघडते. रोगी पुरुषाचा दु:ख दररोज वढ त असते. रोगी दु:खातितशयाने अपघात करू इच्छितो. रोगी पराधीन होतो. त्याचे मन व इंद्रिये चंचल होतात. त्याला उठणे, निजणे, चालणे फार कठिण होते. प्रत्येक श्वासाबरोबर त्याची वेदना वढ त जाते. क्षणमात्रही त्याला चैन पडत नाही. फार काय रोगी माणसाला खाणे, पिणे, बोलणे, चालणे, उठणे, निजणे, वगैरे सर्व कार्ये विषप्राशनाप्रमाणए दु:ख देणारी होतात. म्हणून प्रासुक (शुध्द) औषधाचे दान करून रोग नाहीसे करणे यासारखा दुसरा उपकार नाही. रोग नाहीसा झाला असता आहार घेता येतो. व्रत, तप, संयम, ध्यान, स्वाध्याय, कोयोत्सर्गादिक करता येतात. म्हणून औषधदान करणे हे महत्पुण्याचे कार्य आहे.

तिसरे, ज्ञानदानासारखा उपकार जगात दुसऱ्या कोणत्याही वस्तूंनी करता येण्यासारखा नाही. ज्ञानाशिवाय मनुष्यजन्म हा पशूसारखा आहे.ज्ञानाभ्यासाशिवाय आपला व इतरातील भेद समजत नाही. ज्ञानावाचून धर्म कोणता, अधर्म कोणता, पाप कोमते, योग्यायोग्य काय याचा विचार करता येत नाही. ज्ञानाशिवाय देव,कुदेव, गुरु, कुगुरु, यातील भेद समजत नाही. ज्ञानाशिवाय मोक्षामार्ग कळत नाही. ज्ञानाशिवाय मोक्षाही नाही. ज्ञानरिहत पुरुष व पशू यात भेद नाही. इंद्रियांचे विषय पुष्ट करणे, कामसेवन करणे हे तर पशू देखील करतात. मनुष्य जन्म हा ज्ञानामुळेच पूज्य आहे. म्हणून ज्ञानदान दिले त्या पुरुषाने सर्व दान दिले असे म्हणता येईल. ज्ञानदान देणे हा मोठा उपकार आहे.

वसतिकादान म्हणजे स्थानदान होय. ज्याठिकाणी शीत, उष्ण, पाऊ, वारा यांची बाधा न होता ध्यान-स्वाध्या करता येईल अशी जागा तयार करून अथवा बांधून देणे याला वसतिकादन म्हणतात. उत्तम पात्र अशा परम दिगंबर महामुनींच समागमक वचितकाल घडून येतो. जगात सर्वत्र पाषाण भरलेले आहे. त्यातून चिंतामणी रत्नाचीक वचित कोणाला तरी प्राप्ती होते, तसे वीतराग साधूंचा समागम फार दुर्लभ, कदाचित असा समागम प्राप्त झाल तरी त्यांना आहारदान आपल्या हातून घडणे कठिण. तो

आहारही मुनीच्या निमित्ताने केलेला नूसन सोळा प्रकारचे उद्‌गम दोष, सोळा उत्पादनदोष दहा एषणादोष, याप्रमाणे बेचाळीस दोष व १ प्रमाण, १ संयोजन, १ धूम, १ अंगार असे चार मिळून शेहेचाळीस दोष टाळून केलेला असावा. दिगंबर साधू शेहेचाळीस दोष, बत्तीस अंतराय, चदा मल टाकून एकवार, भोजन घेतात, तेही अर्धे पोट अन्नाने, चतुर्थांश पाण्याने व चतुर्थांश रिकामे ठेवून घेतले पाहिजे अशी परमागमाची आज्ञा आहे. कधी एक उपवास, कधी दोन कधी तीन, कधी चार, कधी पक्षोपवास तर कधी मासोपवासही मुनी करतात. भिक्षेच्या वेळी अयाचक वृत्ती धारण करावयाची व नवधा भक्तीने अन्न मिळाले तर घ्यावयाचे अशा दंडक आहे. याप्रमाणे मुनीला आहार एखाद्या पुण्यवान पुरुषाच्या घरी मिळावयाचा. अयाचक वृत्ती धारण करणाऱ्या मौनी मुनीला औषधदान देण्याचा योग जमणे फार कठिण. कोणा गृहस्थाने आपणाकरिता शुध्द औषधी तयार करविली असेल व अचानक मुनीश्वरांचा समागम प्राप्त झाला तर त्यांच्या शरीरातील रोग, चेहऱ्यावरून त्यांनी न सांगता जाणून योग्य औषध असेल तर द्यावे. पण असा योग जमणे कठिण असल्यामुळे मुनींना औषध दान मिळत नाही. शास्त्रदान दिले तर ते वाचण्याची इच्छा असेल तर वाचेपर्यंत ठेवतात. पुढे चैत्यालयात ठेवून निघून जातात. मुनींना वसतिकादान ही दुर्लभ आहे, कारण दिगंबर साधू एकाच जागी राहात नाहीत. कधी पर्वताच्या गुहेत तर कधी भयंकरवनात, कधी नदीच्या वाळवंटात बसून ध्यान करतात. एखाद्या वसतिकेमध्ये वा खेड्यात एक दिव व शहर असल्यास पाच दिवस व पावसाळ्यात चार महिने एका जागी त्याना रहावे लागते. अथवा एखाद्या साधूची समाधि-मरणाची वेळ आली असेल तर ते महिना-दोनमहिने एक जागी रहातात. याशिवाय जैनसाधू एका जागी रहात नाहीत. एक रात्र किंवा दोन रात्रीक क्वचित् एखाद्या निर्दोष वसतिकेत राहतात. ती वसतिका पण त्यांच्याकरिता मुद्दाम तयार केलेली नसावी. त्यांच्या देखत जागा झाडून काढता कामा नये. त्यांच्या समक्ष ती धुता उपयोगी नाही. उजेड येण्याची दारे पण त्यांच्या समक्ष उघडू नयेत. दार वाले असेल तर त्यांच्या समक्ष उघडू नये. भाड्याची जागा त्यांच्या करिता घेऊ नये. आपली जागा राहण्यास देऊन दुसऱ्याची जागा बदल्यात घेऊ नये. याचना करून अथवा राजाचे भय दाखवून पण ती घेतली नसली पाहिजे. अशी वसतिका असेल तर तेथे कदाचित वर सांगितल्याप्रमाणे मुनी राहिले तर राहतात. याप्रमाणे शेहेचाळीस दोषरहित वसतिका असेल, अथवा ओसाड जागी एखादे घर असेल, त्या ठिकाणी असंयमी लोकांचे येणे-जाणे व स्त्री नपुंसक तिर्यंचांचे आगमन नसेल, ज्या ठिकाणी जीवाची विराधना होत नसेल व अंधकार नसेल तेथे साधऊ एक किंवा दोन रात्री राहतात. अनेक देशात विहार करणाऱ्याला वसतिकादानाचा उपयोग होणे फार कठिण आहे. अशा उत्तम पात्राला दान देण्याचा प्रसंग प्राप्त होणे कठिण. सध्या पंचमकालात वीतरागी भालिंगी साधूक क्वचित कोठे तरी असावयाचे. अशा सांधूंचा समागम होणे शक्य नाही. चतुर्थकालात अशा पात्रांचा लाभ महत् भाग्यानेच होत असे. परंतु त्यावेळी या क्षेत्रात उत्तम पात्रे तरी पुष्कळ असत. पण आता या दु:खमाकालात यथार्थ धर्म पाळणारे पात्र पाहण्यासही मिळणे कठिण झाले आहे. धर्मभ्रष्ट, लोभी, अज्ञानी वगैरे पुष्कळ साधू आढळतात. पण ते सर्व अपात्र आहेत. या कालातही जिनधर्माचे श्रध्दान पक्के असणारे गृहस्थही कोठे कोठे आढळतात. वीतराग धर्माचे श्रवण करून कुधर्माची आराधना करण्याचा ज्यंनी त्यग केला आहे व अहिंसा धर्म धारण करून जिनवचनरूपी अमृतपान करून शील व संतोषवृत्ती धारण केली आहे असे

तपस्वी हेच उत्तम पात्र आहे. याशिवाय इतर भेषधारी पुष्कळ असून काय उपयोग( ज्यांना मुनिधर्म व श्रावकधर्म यातील भेद कळला नाह, सम्यग्दर्शन वगैरेचे यथार्थ ज्ञानही नाही, त्यांच्या ठआयी सत्पात्रत्व कसे असणार( मिथ्यदर्शनाच्या प्रभावाने आत्मज्ञान होत नाी. अंतरंगातील लोभवृत्तीमुळे मधुर भोजनाची इच्छा करणारे पुष्कळ अढळून येतात ते सर्व अपात्र समजावेत.

या कलिकालात भावलिंगी मुनीश्वर, अर्जिका व क्षुल्लक येतात ते सर्व अपात्र समजावेत. पण चिंतामणि रत्नाप्रमाणे एखाद्या भाग्यवान पुरुषाला त्यांचा समागम होऊन दान देण्याचा योग आला तर त्यांना पवित्र अन्नाचे भोजन द्यावे.अर्जिकेचा समागम घडल्यास तिला एक पांढरे वस्त्र द्यावे. तिने ते वस्त्र घेऊन जुनी तेथेच टाकावे. क्षुल्लकाला एक कौपीन (लंगोटी) व अपुरे वस्त्र ज्या योगे त्याला आपले सर्वांग झाकता येणार नाही असे द्यावे. त्यानेही तसे मिळाल्यानंतर जुने तेथेच टाकावे. याशिवाय दुसरे काहीही ग्रहण करू नये. आपण आमंत्रण न देता कदाचित असे प३ात्र आप्या घरी अचानक आले तर गृहस्थाने आपणाकरिता केलेल्या अन्नातून ते द्यावे. अशी दान देण्याची पध्दती असल्यामुळे गृहस्थाला दानासाठी वेगळ्या खर्चाचा बोजा पडत नाही. अशा स्थितीत धनवान पुरुषाने आपले द्रव्य कोणत्या कामी लावून ते सफल करावे(असा प्रश्न उत्पन्न होतो. भोगोपभोगामध्ये त्याचा विनियोग करावा तर ते भोगोपभोग तृष्णा वढविणारे व इंद्रियांना विकल करून महान पापामध्ये प्रवर्तिवणारे आहेत व त्यापासून नरक-गतीची प्राप्ती होते व आपल्या हिताहिताचे ज्ञान नाहीसे होते. मोहामुळे, ममतेमुळे आपले पुत्रादिक त्या द्रव्याचे मालक आपोआप होतातच. त्याअर्थी पापाचार करून दुर्ध्यानाने धर्माचा विध्वंस करून जी प्राप्त करून घेतली त्या संपत्तीचा अर्धा भाग धर्माकरिता, दयेकरिता, सत्पात्राला दान देण्यात खर्च करून आपले हित करून घ्यावे.

येथील संपत्ति सोडून परलोकी जाल त्यावेळी पुत्रपौत्रांना पाहण्याला परत याल काय ( कुटुंबाचा संबंध तुमच्या या चर्माच्छादित शरीराशी आहे. याचा नाश होऊन हे मातीशी मिळून जाईल. कुटुंबातील माणसे तुमचा दुसरा पर्याय पहावयास येणार नाहीत. तुम्ही त्यांना पहावयास येणार नाही. कारण ज्या इंद्रियांनी तुम्ही कुटुंबाला जाणता ती जळून भस्म झाली. आता तुम्ही तुमच्या कुटुंब३ालाकशाने पाहणार( पुत्रादि कुटुंबाचा संबंध तुमच्या शरीरावरील चामड्याशी आहे. ते तुमच्या आत्म्याला जाणत नाहीत. मग तुमचे शरीर जळून राख झाल्यावर तुमच्याशी कोठे संबंध करणार( म्हणून हे ज्ञानी पुरुषांनो, जीवन हे अल्प आहे. पुत्रपौत्रादिकांचा संबंधही अल्पकाल राहणारा आहे. संसारात आपले रक्षण करणारा कोणीही नाही. फक्त एक धर्मच शरण आहे. हे द्रव्य तुमचे नव्हे. कोणी एखादा पुण्यप्रभावाने दोन दिवस याचा मालक झाला तरी पुन: त्याचा त्याग करून त्यास मरावे लागणार आहे. हे द्रव्य परलोकी बरोबर येणारे नाही. पुत्राच्या प्रीतीने अनेक प्रकारचे दुराचार करून जे द्रव्य तुम्ही साठवीत आहात ते हे धन व पुत्रावरील ममत्व (प्रेम) तुम्हाला संसारात स्वत्वाची भूल पाडून नरकाला पोहोचवील. त्यापासून अनेक जन्मात दरिद्री होऊन फिरावे लागेल. हजारो माणसे दररोज अन्नान्न करून मरत आहेत. दरिद्री व दीन होऊन घरोघर भीक मागत आहेत. त्याकडे कोणी पाहात नाही. त्ांचे म्हणणे कोणी एकून घेत नाही. तरी हा सर्व प्रभाव त्यांनी पूर्वी अनेक जन्मात द्रव्यावर तीव्र ममता केली त्याचे फल आहे. तुम्हाला वैभव,

संपत्ती, रत्ने, सुवर्ण, रुपे वैगेरे वैभव प्राप्त झाले आहे, अनेक प्रकारेचे सुरस अन्नाचे मधुर भोजन दररोज मिळत आहे, रुपवती, शीलवती व प्रीतिरसाने भरलेल्या स्त्रीचा समागम प्राप्त झाल आहे. आज्ञा धारण करणारे पुत्र आहेत, सदैव धन्याचे हित इच्छिणाऱ्या व चतुर अशा सेवकांचा लाभ झालेला आहे. मोठमोठी विस्तृत व सुंदर अशी घरे व बंगले राहण्यास मिळत आहेत. याशिवया इतरही प्रभावाने भोगभूमीत जन्म व स्वर्गातील विमानांचा स्वामीपणा प्राप्त होतो. त्याठिकाणी असंख्यात कालपर्यत सुख भोगता येत, येअसे असता इहलोकी प्राप्त झालेली थोड्या वेळेपर्यंत टिकणारी व दु:ख दायक अशा तुच्द संपदेची व अतिशय मलिन अशा देहाची मातबरी का ठेवावी( ही संपदा तुमच्याजवळ स्थिर राहणारी नाही ही लक्ष्मी आमची आहे. आमच्या कुलपरंपरेने चालत नाही, ही आमच्यापासून नाहीशी होण्याइतके मूर्ख अजून आम्ही बनलो नाही, म्हणून ती आमच्यापासून नाहीशी होणर नाही अशे तुम्हास वाटत असेल तर हा तुमचा निव्वळ भ्रम आहे. या भ्रमाचे कारण मिथ्यादर्शन आहे. अनंतानुबंधी कषायाच्या उदयाने तुम्हाला अभिमान उत्पन्न झालेला आहे. तो थोड्याच दिवसात तुम्हाला नारकी बनवील. याकरिता हे सत्पुरुष हो( जर तुमची जिनवचनावर श्रध्दा असेल, धर्मावर प्रीती असेल, दु:खी लोकांना पाहून दया प्राप्त होत असेल, तर मनात सम्यक्त्वाचे चिंतन करा की, ((आपण धनावर ममत्व करून पूर्वीच्य धनाची महत्प्रयासाने रक्षा केली व नवीनही पुष्कळ मिळविले ते उपार्जन करण्याकरिता क्षुधा, तृषा, शीत, उष्णादिक व्यथा भोगल्या. अनेक प्रकारचे व्यापार, राजसेवा, विदेशगमन, समुद्रप्रवेश वगैरे आरंभ केले. अधर्मी अशा म्लेच्छ लोकांना खुष करण्यासाठी निंद्य कर्मे केली, हरेक प्रत्यन करून धन उपार्जन केले. आता अचानक मरण प्राप्त झाले तर या धनाचे रक्षण कोण करील( आता आपण अन्याय, अनीती व पापरूप व्यापार, पापी लोकांची सेवा करून धन उपार्जन करण्याचा अवश्य त्याग केला पाहिजे. न्यायाने प्राप्त होणाऱ्या द्रव्यामध्ये मर्यादा करून राहिले पाहिजे. तसेच आजपर्यंत ज्यापासून अन्नायाने व बळजबरीने धन घेतले, अथवा लोकांचया मनाला दु:ख देऊन, त्यांना थाप देऊन, भुरळ पाडून, चकवून, फसवून जे घेतले ते सर्व त्यांना परत देऊन त्यांचीक्षमा मागावी. आपल्या द्रव्यातून मुळाबाळांचा भाग व धर्माचा भाग असे दोन निरनिराळे विभाग व परोपकाराकरिता दानिवभागातून नेहमी द्रव्य खर्चित जावे.आपण जे नवीन धन संपादन करीत असू त्यातून देखील चौथा, सहावा, आठवा अथवा अगदी जघन्य म्हणजे दहावा भाग तरी निदान पुण्यकार्यामध्ये लावावा. त्या दानाचा विभाग संकटग्रस्त, निर्धन, दु:खी वगैरे सर्वांना प्राप्त व्हावा. ज्याला आपले उदरपूर्ती इतके देखील अन्न मिळत नाही, अर्धे पावशेर कसे तरी महान कष्टाने अन्न प्राप्त होते. त्याने देखील मिळालेल्या अन्नातून दानविभाग म्हणून वर वर्णिल्याप्रमाणे वेगळा काढून तो दु:खी व बुकेलेल्यांना दिला पाहिजे. दानाशिवाय नुसते घर स्मशानाप्रमाणे असून त्या घरातील माणसे मेलेल्या माणसासारखी व इतर कुटुंबीजन गिधाड पक्षाप्रमाणे त्या पुरुषाचे धनरूपी मांस वारंवार टोचे मारून खात आहेत असे समजावे. जे गृहस्थ धनवान् आहेत ते जैनांचे अनेक प्रकारे पालन करतात. जे धर्मात शिथिल झाले असतील त्यांचा धनाढ्यपुरुषांनी सन्मान केला व त्याशी मिष्ट भाषण केले तर ते धर्मात पुनरपि दृढ होऊन राहता. कित्येक काम करण्यायोग्य, चाकरी करण्यायोग्य असतील, त्याजकडून काम करून घेऊन त्यांचे उदरपोषण करावे. कित्येक व्यापार करून द्रव्य कमावण्या लायक असतील त्यांना द्रव्य-सहाय्य देऊन त्यांचे रक्षण करावे.

कित्येकांना व्यापारधंद्यास लावून त्यांचा उदरनिर्वाह करवावा. कित्येकांना धैर्य देऊन, व्यापार करवून द्रव्य उत्पादन करविण्यास शिकवावे. कित्येकांना दुसऱ्यास सांगून रोजगाराला लावावे, कित्येकांना योग्य मार्गदर्शन देऊन धंद्याला लावावे, पुण्यवान् जीवांच्या आश्रयाखेरीजमनुष्याला आपल्या पायावर उभा राहता येणे फार कठिण पडेत. अशा कृत्यांनी आपले धन नाहीसे होईल अशी भीती बाळगू नये. आपल्या धर्मभांधवांच्या कामी उपयोगी पडणारे धन हेच आपले असा विचर मनात आणावा.

जे धन याप्रमाणे धर्मबंधूंच्या उपयोगी पडले नाही ते आपले नव्हे असे समजावे. यापूर्वी कित्येक मोठमोठे धनवान व प्रितष्ठित होऊन गेले, त्यांचे धन कर्मोदयाने नाहीसे झाले, अीविका नाहीशी झाली, खाण्यापिम्याची पंचायत पडली, भुकेमुळे घरात बायका-पोरांचा भयंकर त्रास होऊ लागला अशा पुरुषाला मेहनत-मजूरी होत नाही. त्याच्याने हलके काम होत नाही. मोठा मनुष्य म्हणून कोणी ठेवून घेत नाहीत. आभरण, वस्त्र, पात्र वगैरे सर्व विकून आजपर्यंत चालले आता कोणाला सांगावे( काय उपाय करावा( अशा विवंचनेत पडलेल्या प्रतिष्ठित दु:खी पुरुषाला आजीविका करून द्यावी. घाबरलेल्या मनुष्यास द:ख इ समुद्रातून हात देऊन वर कढा ावे. धर्माकडे त्याचे लक्ष ा वेधावे. थोडाबहुत आश्रय देऊन त्यास आपण मदत करावी अथवा इतराकडून करवावी.

याशिवाय जे कोणी स्त्री-पुत्ररहित असतील त्यांना धर्मकार्याकडे लावून त्यांचे खाण्या-पिण्याचे दु:ख नाहीसे करावे. कित्येक वृद्ध झाल्यामुळे उद्योग करण्यास असमर्थ असतील कित्क जिनधर्मावर दृढ श्रद्ध ठेवीत असूनही इंद्रिये शिथिल झाल्याने व शरीरात रोग प्राप्त झाल्याने काही काम करवत नसेल अशांना कोणाच्या तरी सहायाची जरू री असते. त्यांना धनवान पुरुषांनी आश्रय देऊन धर्मात स्थिर करावे. हे कार्य द्रव्यवान पुरुषांकडूनच होणार आहे. कित्येकांना पुत्रादि नसल्याने निराश बनावे लागले असेल त्यांना धर्माचा आश्रय करवावा. कित्येक श्राविका दुर्दैवाने विधवा झाल्याने व त्यांना कोणाचाही आधार न राहिल्याने अन्नवस्त्राची उणीव भासत असेल त्यांना करुणाबुद्धीने अन्नवस्त्राची सोय करू न देऊन धर्ममार्गाकडे लावावे. धनवान पुरुषांच्या सहाय्याने निर्धन लोकांचे स्वधर्माचे अवलंबन स्थिर राहते. कित्येक अणुव्रते धारण करतात. कित्येक पाचवी प्रतिमा धारण करू न सचित्त वस्तू खाण्याचा त्याग करतात, कित्येक पर्वतिथीला उपोषण करू लागतात. कित्येक नियमितकाल ब्रह्मचर्याचा व कित्येक आजन्म स्त्रीत्यागाचा नियम घेतात. कित्येक परिग्रहाचा, पापकार्याला अनुमोदन देण्याचा, उद्दिष्ट आहाराचा त्याग करतात. याप्रमाणे श्रावकाच्या अकरा प्रतिमा धारण करण्याने दान घेण्याला पात्र होतात. धनवान पुरुषांची धर्माकडे प्रवृत्ती पाहून अनेक लोक त्याच मार्गाचे अनुकरण करतात.

श्रीमंत माणसांनी विद्या पठन करण्याची स्थाने (पाठशाळा) तयार करावीत. त्यात शिकणाऱ्या उपजीविकेची सोय करावी. त्यात व्याकरण, न्या, काव्य, गणित, तर्क वगैरे अनेक विद्या शिकण्याची सोय असावी. यातून जैनामध्ये शेकडो विद्यार्थी शिकून तयार होतील तर धर्मपरंपरा टिकेल. कित्येक बुद्धिमान असून त्यांना उपजीविकेचे साधन नसेल तर काही तरी साधन करू न देऊन त्यांना निराकु केल्याने धर्मप्रवृत्ती चालू राहते. याचप्रमाणे अनेक ग्रंथ लिहवून ते विद्यार्थ्यांना अथवा वाचरणाऱ्यांना द्यावे. ग्रंथ शोधण्याकरिता योग्य असलेल्या लोकांना मदत करावी. ज्ञानाभ्यास करणाऱ्यावर प्रेम करावे, आपल्या

आत्म्याला ज्ञानाभ्यासात लावावे, आपल्या पुत्राला व कुटुंबीजनांना त्रानाभ्यासात लावावे व जसे बनेल तशी लोकांना शास्त्राच्या अभ्यासात रुची उत्पन्न करावी. शास्त्र हे धर्माचे बीज आहे. शास्त्राचे ज्ञान झ ाले असता शेकडो दुराचार नष्ट होतात.

औषधदान देण्यात फार पुण्य आहे. अनेक रोगाला नाहीशी करारी औषधी तयार करून रोग्यांना देण्याची सोय करावी. निर्धन माणसांना आयती तयार औषधे मिळाल्यास त्यांना त्यांचा फर उपयोग होऊन उपकार घडतो. केवळ निर्धन माणसांनाच त्याचा उपयोग होत नसून श्रीमंत माणसाला देखील त्याचा उपयोग होतो. निर्धन व द:खी लोकांना औ,धदान देण्यात महत्पु्य आहे. गरीब व दरिद्री माणसांना औषध मिळत नाही. त्यांना कोणी तयार करून देत नाही. तयार करून देणारा असला तरी जवळ पैसा नसल्याने त्यास सामग्री आणून देता येत नाही, म्हणून त्यांना आयती तयार औषधे मिळण्याने रोगप्रतिकार करता येतो. रोग नाहीसा करण्यासारखे दुसरे दान कोणतेही नाही.

अभयदान हेही तसेच श्रेष्ट आहे. धर्मवान जीवांना राहण्याकरिता, त्यांना धर्मसाधन करण्याकरिता आपल्या श्क्तीप्रमाणे धर्मशाळा वगैरे बांधवून द्याव्या. आपल्या घरी जागा असल्यास तेथे त्यांची राहण्याची सोय करावी. कारण राहण्यास योग्य स्थळ मिळाल्याशिवाय धर्मसाधन करण्यात परिणाम स्थिर होऊ शकत नाहीत. कोणी सहधर्मीपर देशी, दु:खी, आगंतुक आला तर महिना दोन महिने त्याच्या जेवणण्याची सोय करून द्यावी. कोणी प्रवास करीत असता त्याजजवळील धन संपून अडचणीत पडला व त्यामुळे त्यास आपल्या गावी पोहोचण्या इतकेही पैं नसले, अथवा रस्त्यात चोरांनी गाठून त्याजपासून सर्व द्रव्य नेले व तो स्वधर्मीय जाणून आपल्याकडे आला तर त्याला गावी पोहोचण्याइतकी मदत करावी. परदेशी असून रोगी असेल त्याला राहण्यास जागा देऊन औषधोपचार करवावा. वरचेवर त्याला धर्मोपदेश देत असावे. त्याचा दररोज समाचार घ्यावा. त्याचे वैय्यावृत्त करावे. निर्धन माणसाकडून न होणारे असे औषधदान धनवान पुरुषाने अवश्य करीत रहावे. ज्यांच्या परिणामात चंचलता प्राप्त झाली असले, रगाने, वियोगदु:खाने दारिद्र्याने जे घाबरले असती त्यांना दर्मोपदेश देऊन धैर्य धारण करवावे.

आपण आपल्या आत्म्याला निरंतर ज्ञानसमृद्ध करीत असावे. ज्ञानवान असलात तर अनेक जीवांना धर्मोपदेश द्यावा. अथवा कोणी शास्त्रार्थ जाणणार्या पुरुषाची प३ाप्ती झाली तर तो कल्पवृक्षासारखा लाभ समजून मोठ्या हर्षाने त्याच्या उपजीविकेची व्यवस्था करून घ्यावी. त्याशी अतिशय नम्रपणाने वागून आदराने धर्मग्रहण करावा. धर्मवृद्धीकरिता ज्ञानी पुरुषांचा सन्मान करून धर्मोपदेशाची, तत्त्वनिर्णयाची गुणस्थानमार्गणाची चर्चा करवावी. धर्माची व सम्यगज्ञानाच्या प्रभावनेची प्रवृत्ती करावी. ज्याठिकाणी धर्मप्रवृत्ती शिथिल झाली असेल त्या गावी शास्त्रे लिहवून, भाषांतर करवून योग्य अशी पुस्तके पाठवून द्यावी. ज्ञानदान सर्व लोकांना करीत जावे. संपत्ती प्रापत् झाली असता दान सन्मानाने, प्रियवचनाने, आपल्या मित्र, कुटुंबाला देऊन आनंदित करावे. संपदो समागम आणि आयुष्य हे क्षाणभंगुर आहेत. धनाने, देहाने व वचनाने अन्य जीवांवर नेहमी उपकार करीत राहणे हेच मनुष्यजन्मातील श्रेष्ठ कर्तव्य आहे.

गोड बोलणे हे मोठे दान आहे. शत्रूवरील आपले वैर सोडून प्रियवचनांनी त्याची क्षमा मागणे हे देखील मोठे दान आहे. आपले द्रव्य, जमीन-जुमला देऊनही प्रसंगी त्याला संतुष्ट करावे. त्याविषयी आपलया मनातून वैर नाहीसे करावे व अभिमान नाहीसा करावा. दरिद्री असून कुटुंबवत्सल असेल त्याचा शक्तीप्रमाणे दान देऊन सन्मान करावा. आपली बहीण, मुलगी निर्धन असेल तर त्यांना वरचेवर भोजन-पान, वस्त्र प्रावरणादिकांनी संतुष्ट ठेवावे. दयाळू पुरुष दुसऱ्याचे दु:ख, दानसन्मानादिकांच्या योगे नाहीसे करतात. मग जी माणसे भाऊ, बहीण, आत्या, मुलगी, जावई वगैरे आपल्या कुटुंबाची अंगे आहेत त्यांना कधीही दु:खी ठेवू नये.

कोणी आपले नुकसान केले तरी त्याला कटु वचन बोलू नये. त्यांना म्हणावे, (ओपण आपल्या परिणामात संताप होऊ देऊ नका. गृहस्थाश्रमात लाभ अलाभ कर्मानुकूल होत राहणार. आजूबाजूची सर्व सामग्री विनाशक आहे. तुम्ही आपल्याकडून होईल तितक्या प्रयत्नाने व सद्धेतूने आमचे कार्य सुधारावे म्हणून प्रयत्न करीत आहात. पण आमच्या कर्मानुसार त्यात यश येत नाही. याबद्दल आपण वाईट मानू नये.( अशा मधुर भाषणांनी त्याला संतुष्ट करावे. आपल्या धनापासून कोणा तरी जीवावर सदैव उपकार घडावा अशी चिंता करीत असावे. इतर लोक आपले हित करोत वा अहित करोत आपण मात्र सदैव उपकार करणयाविषयी तत्पर असावे. याचप्रमाणे कोणी कैदेत पडला असेल, कोणावर खोटा खटला झाला असेल तर त्याला मदत करून सोडविण्याचा प्रयत्न करावा. कोणी आपले धन चोरले असेल तर मधुर भाषणांनी शांतभाव धारण करून त्याला समजावून ते परत घ्यावे. निर्धनाशी कोणत्याही कारणामुळे तंटा करू नये. कोणी काही वस्तू चोरून खात असेल तर ते पाहून त्याची चारचौघात फजिती करू नये. आपले आश्रित असतील त्यांचे पालनपोषण करावे. विधवा स्त्रिया, अनाथ मुले, मामसे, रोगी व वियोग दु:खाने व्यापलेले असतील त्यांचे दु:ख नाहीसे करण्यात तत्पर असावे. बालक वा बालविधवा असेल तर त्यांचे काळजीपूर्वक पालनपोष्ण करावे. आपणाशी जे वैर करीत असतील व आपण उपकार केला असूनही त्याला जे अपकार मानत असतील त्याविषयी मनात विषद न मानता त्यांचा नामसन्मान करावा. योग्य प्रसंग प्राप्त झाला असून जर आपल्या आप्तमित्राचा आपण सन्मान केला नाही तर आपणास प्राप्त झालेले धन व ऐश्वर्य व्यर्थ समजावे. आपापल्या मुला-लेकरांचे पालन कुत्री, मांजरे देखील करतात. त्याचप्रमाणे आपणही आपल्या मुलाबाळांचे कल्याण केले यात महत्त्व नाही. प्रसंगानुसार आपला नाश करणाऱ्यांचे, आपले द्रव्य हरण करणाऱ्यांचे व शत्रूचे देखील आदरातिथ्य करून त्यांचा ममानसन्मादिकांनी आदर करून वैराचा अभाव करणे फार कठिणम व ते करणे यातच खरा पुरुषार्थ आहे. मनुष्यजन्म, धनसंपदा, यौवन, ऐश्वर्य वगैरे सर्व क्षणभंगुर आहेत. आजपर्यंत अनेकाचे धन व ऐश्वर्य नष्ट झाले. त्यांच्या नावाचा मागमूसही कोठे उरला नाही. श्रीकार्तिकेयस्वामींनी म्हटले आहे. पुष्कळशा सुशोभित वस्त्राभरणानी, स्नान, सुगंधविलेपन विविध सुरस भोजनपानादिकांनी अत्यंत काळजीने पोषिलेला हा दह देखील एक क्षणात थोड्याशा आघाताने काचेच्या भांड्याप्रमाणे नाश पावणार आहे. जी लक्ष्मी चक्रवर्त्यादिक महान पुण्यवान जीवांजवळ रममाण होऊन राहिली नाही त अन्य पुण्यरहित जीवांवर प्रेम करून त्‍ापाशी स्थिर कशी राहील( लक्ष्मी पुण्वान जीवाजवलही सदैव राहू शकत नाही. कोणी म्हणेल की, माझे कुल उच्च आहे. माझ्या कुलात आज पावेतो लक्ष्मी राहात आली आहे म्हणून ती

सदव राहीलच असे समजू नय. ती कुलवानाजवळ राहील अथवा राहणारही नाही. कदाचित नीच कुलवाल्याजवळही जाऊन राहील. धीर पुरुषापाशी रममाण होईल, अथवा होणारही नाही. पंडित वा चतुर पुरू षापाशीही टिकेल अथवा टिकणार नाही. शूरापाशी अतवा भित्र्यापाशीही राहील किंवा राहणार नाही. पूज्य पुरुषापाशी, सज्जनापाशी, महापराक्रमी पुरुषापाशी व धर्मवान जीवापाशीही नियमाने राहीलच अस नियम नाही. भावार्थ - संसारात अज्ञानी लोकांना भ्रमामुळे असे वाटत असते की, मी कुलवान् असल्याने मला सोडून लक्ष्मी जाणार नाही. मी पराक्रमी आहे, धीर आहे, त्याअर्थी मजजवळ ती स्थिर राहिलीच पाहिजे. मी पंडित असल्याने हिचे मोठ्या चातुर्याने रक्षण करीन, कारण मी मोठ्या शहापणाने ती प्राप्त करू न घेतली आहे. मूर्ख लोक अज्ञानाने हजारो चुका करतात, त्यामुळे ्याजपासून ती नाहीशी होत असते. तशी स्थिती माझी नसल्याने मी हिचे रक्षण करीन. मी शूर व वीर आहे. त्याअर्थी हिचे शौर्याने मी रक्षाम करीत असताना मजपासून ती कशी नाहीशी होणार( भित्रा असेल त्याची कदाचित नाहीशी होईल. मी पूज्य आहे. सर्वांची लक्ष्मी पूज्य परुषापाशी राहिली पाहिजे. कणी नीच असेल त्याची नाहीशी होणार असेल तर होईल. मी सुखी आहे. माझ्या चर्येवर ल७्मीचे तेज झळकत आहे, दरिद्री मनुष्याच्या मुखावर तेज नसते. मी सज्ज असून सर्वांचा आवडतो आहे. त्याअर्थी मजपून ती नाहीशी होणार नाही. सर्वांना अप्रिय असणाऱ्या जवळूनच ती नष्ट होत असते. मी मोठा साहसी व उद्योगी असल्याने नवीन धंदे निर्माण करू न द्रव्य उपार्जन करीत असतो. त्याअर्थी मजपासून ती नाहीशी होण्याची मुळीच संभव नाही. आळशी व निरुद्यमी पुरुषापासून ती नष्ट होत असते, निव्वळ हा असा विचार मनात आणणे भ्रम आहे.

लक्ष्मी पूर्वी केलेल्या पुण्याची दासी आहे. पुण्यपरमाणू नष्ट होताच ती नाहीशी होते. जीवाच्या पुण्याईचा अस्त होताच सर्व लक्ष्मी, कीर्ती, बुद्धी, प्रीती, प्रतीती वगैरे एका क्षणात नष्ट होतात. म्हणून लक्ष्मीचा उपयोग न्याय्य भोग भोगण्यात करा. परिणामात दयाभाव ठेवून दु:खित बुभुक्षितांना दान करा. हिंचा संबंध पाण्यातल्या तरंगाप्रमाणे क्षणभंगुर आहे. पश्चात हिचा वियोग ठरलेला आहे. जो पुरुष निरंतर या लक्ष्मीचा संचय करण्यात गढून जाईल, तिचा उपभोग घेणार नाही व पात्रांना दानही करणार नाही तो आपल्या आत्म्याला ठकवीत आहे असे समजावे. कारण अचानक मरण प्राप्त झाल्यास त्यास दुर्गतीस जावे लागणार. मग मनुष्यजन्मात येऊन काय मिळविले( जे संपत्तीचा संचय करू न तिला जमिनीत पुरू न ठेवतात ते त्या लक्ष्मीला पाषाणासारखी करतात हे त्यांच्या लक्ष्यात येत नाही. कारण जमिनीत पुष्कळसे पाषाण जसे पुरलेले आहेत तसे लक्ष्मीही पुरलेली राहील. संपत्तीचा दान, भोग, उपभोग याकडे उपयोग केला नाही तर तो पुरुष संपत्तिमान असूनही दरिद्री पुरुषासारखा झाला व त्याची स्वत:ची लक्ष्मी ही दुसऱ्याचीच लक्ष्मी झाली, कारण गावात पुष्कळाजवळ लक्ष्मी असली अथवा आपल्याच शेजाऱ्याजवळ असली तरी तिचा आपणाला काय उपयोग( ती फक्त आपणाला दिसेल, भोगता यावयाची नाही. त्याप्रमाणेच जो आपल्या लक्ष्मीचा भोग घेत नाही त्याची स्थिती असते.

द्रव्यावर अतिशय प्रेम करणारा पुरुष स्वत:च्या पोटाला पुरेसे खात नाही. औषध वस्त्रप्रावरण, राहण्याची जागा वगैरे भोगोपभोगाच्या सामग्रीच्या अभावाने नेहमी दु:ख भोगतो. पण याहीपेक्षा पैसा

खर्च होण्याने त्याला तीव्र दु:ख होत असते म्हणून तो आपले दिवस अशा कष्टात काढतो. असा पुरुष राजाचे किंवा आपले वारस जे स्त्री, पुत्र, भाऊबंद यांचे अनायात हित करून देतो. जो मूर्ख मनुष्य अनेक प्रकारांनी आपल्या बुद्धीचा उपयोग करून संपत्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो व ती कितीही वाढली तरी संतुष्ट होत नाही, पुन: तिची वृद्धी करण्याकरिता अनेक पापरंभ करतो, पापाला भीत नाही, रात्रंदिवस धनसंपादनाचे विकल्प करीत अनेक रात्री झोप घेतल्याशिवाय घालवितो, दिवस निघताच पुन: द्रव्योत्पादानाच्या धंद्याला लागतो, देण्याघेण्याच्या व्यवहारात अनेक प्रकारचा खोटा वादविवाद करीत असता त्याला भुकेचे भान राहत नाही. रात्री हिशेब-ठिशेब, देणे-घेणे, सट्टे-सौदे यांच्या चिंतेने त्यास झोप येत नाही. अशा प्रकारचा मूढ पुरुष लक्ष्मीरूपी तरुण स्त्रीचा दास होऊन अनेक संकटे भोगून दुर्गतीला जातो. जो वृद्धिंगत होणाऱ्या लक्ष्मीचा निरंतर धर्मकार्यात उपयोग करतो त्याची पंडित पुरुषाकडून स्तुती केली जाते व त्यालाच लक्ष्मी प्रापत् होणे सफल होय. याप्रमाणे विचार करून धर्मवान् पण दारिद्र्याने पीडित मनुष्यांना, स्त्रियांना निरंतर ख्याती, लाभ, पूजा, यश यांची अपेक्षा न धरता व त्याकडून आपणावर प्रत्युपकाराची इच्छा न ठेवता. जे मोठ्या आदराने व हर्षाने दान देतात त्यांचे जीवन सफल आहे. ज्या अर्थी धन, यौवन व जीवन ही प्रत्यक्ष पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे अस्थिर आपणास दिसून येतात व दानापासून स्वर्ग व भोगभूमीची लक्ष्मी असंख्यात कालपर्यंत उपभोगता येते असे शास्त्रे वर्ण करतात, त्या अर्थी आपण नेहमी दान करण्यास प्रवृत्त झाले पाहिजे हे उघड आहे. यात विशेष हे की, पूर्वजन्मी सत्पात्र दान ज्यांनी दिले आहे, सम्यक् तपश्चरण केले आहे असे पुरुष या दुष्पम-पंचमकालत भरतक्षेत्रात जन्म घेत नाहीत. या कालात सम्यग्दृष्टी उत्पनन होत नाहीत जे सम्यग्दृष्टी देवगती, नरकगतीतून येतील ते विदेहक्षेत्रात जन्म घेतील. मनुष्य तिर्यंच गीतील सम्यग्दृष्टी मरून स्वर्गलोकी जन्म घेतील. याठिकाणी कोणा पुण्यवान जीवाला काललब्धी वगैर सामग्री प्राप्त झाली तर सम्यक्त्व उत्पन्न होते. पूर्वजन्मी ज्याने जिनधर्म पाळून पुण्य संपादन केले असेल तो येथे सध्या जन्म घेत नाही. म्हणूनच जैनधर्मात सद्याक्षत्रियवंशी महापुरुष उत्पन्न होत नाहीत, तसेच धनाढ्य पुरुष देखील विशेष दिसून येत नाहीत.

जैनकुलात कोणी धनाढ्य झाले तर त्यांना धर्माची रुची नसावयाची. एखाद्या पुण्यवान जीवाला कदाचित सत्यंगती प्राप्त झाली व जैनसिद्धांत श्रवण करण्याचा लाभ मिळाला तर तो स्वधर्माविषयी प्रेम धारण करील. या कालात कोणी जैन श्रीमंत असला व तो धर्म जाणणारा असला व व्रत, उपोषण, त्याग वगैरे करीत असला तरी त्याला दानामध्ये द्रव्य खर्च व्हावे असे वाटत नाही. लाखो रुपयांचे धन येथे सोडून तो मरण पावतो, परंतु त्यापैकी अर्धे किंवा चतुर्थांश देखील दानाकडे लावीत नाही.

कलिकालातील धनाढ्य पुरुषांना सदैव क्रोध वाढता असावयाचा. आपल्या पुरुषार्थाचा जबरदस्त अभिमान असावयाचा. वत्सलता (प्रीती) समूळ नाहीशी व्हावयाची. दुसऱ्यांनी काही सत्कर्म केलेले पाहवत नसावयाचे. सर्वांची अक्कल वा बुद्धी कमी दिसावयाची. दया असावयाची नाही. अन्य पुरुषांचा अपशब्दाने अपमान व तिरस्कार करण्यात शंका धरावयाची नाही. कोणी नीतीने बोलत असला तर त्याचे अपशब्द बोलून अथवा कुयुक्ती रचून खंडन करावयाचे. धर्मात्मा पुरुष आपणाजवळ विनयाने संभाषण

रीत आहे, त्याअर्थी याचा हेतु काही तरी मागण्याचा असावा अशी शंका यावयाची. निर्वांछल व सहधर्मी लोकांचे भय वाटायचे, कारण तो कदाचित धन खर्चण्याचा उपदेश देईल. वरचेवर अभिमान वाढत जावयाचा. स्वभाव फार तामसी बनावयाचा. आपले का मतत्काळ व्हावे अशी नेहमी इच्छा चालावयाची. दुसऱ्याचे दु:ख व दुसऱ्याचे प्रयोजन तुच्छ मानावयाचे. संपत्ती वाढेल तसा खर्च वाढावयाचा व खर्चाच्या मागून दु:ख वाढावयाचे यामुले रात्रंदिवस खर्च कमी कसा होईल, हीच चिंता असावयाची. आपल्या बोगोपभोगाची वसतू आपल्याला अर्ध्या किंमतीत मिळावी अथवा आपण धनाढ्य म्हणून लोकांनी पुष्कळ किंमतीची वस्तू अल्प मोलात द्यावी अशी इच्छा करावयाची. कोणी चोरीची वस्तू आणून अल्पमोलात दिली असता फार संतोष मानावयाचा. द्रव्याचा संचय होत असूनही तृप्ती व्हावयाची नाही. धनवा असून पापी असला तरी त्यावर प्रीती करावयाची. इतर पुरुष धनवान असून परधर्माचा असला व तयाची सदबुद्धी असली तरी तो चांगला आहे असे मानवयाचे नाही. धनवानापाशी आपल्या औदार्याच्या गोष्टी बोलावयाच्या. निर्धनापाशी आपले दु:ख सांगावयाचे. दु:खी कोणी भेटला की त्यापाशी आपले दु:ख सांगावयाचे. इतरांची किंवा निर्धनाची अब्रू कमी मानावयाची. निर्धनी माणसाला आपली वस्तू देण्याचा प्रसंग आला असता त्याच्याबद्दल मोठा अविश्वास प्रदर्शत करावयाचा. निर्धनाला चोर व दगाबाज समजावयाचे. आपण लोकांचे सर्वस्व मिळून टाकले असले तरी स्वत:च्या खरेपणाबद्दल डौलमिरवावयाचा. आपल्या कर्तव्याची सदैव प्रशंसा करावयाची दुसर्याच्या उत्तम कार्याला नांवे ठेवावयाची, आपण स्वत: निस्पृह असून दुसरे सगळे अतंयत लोभी आहेत असे म्हणावयाचे. आपण स्वत: अजर अमर आहो असे समजावायचे. आपण स्वत: न्यायी, सर्वात श्रेष्ट असून इतर लोक रंक आहेत असे म्हणावयाच. आरंभपरिग्रहण वाढवीत असता कंटाळा वाटावयाचा नाही. मरणापर्यं संतोष धारण करवत नाही. खोटे काम करण्यातही आपण तरबेज आहोत असे समजावयाचे, अत्यंत धूर्त, अतिशय कपटी, अप्रतिम लबाड पुरुषाला व आपण काम साधून देण्यात प्रवीण असणाऱ्याला पुरुषार्थी समजा्याच. सत्यवादी व मर्यादित प्रवृत्तीने राहणारा निरपेक्षा असेल तयाल बुद्धिहीन समजावयचे. ज्या ठिकाणी आपले कषाय पुष्ट होतील, आपले नांव होईल, आपल अभिमान वाढेल अशा मंदिर, बागबगचे, ल्गनकार्य, यात्रा वगैरे जाग पुष्कळ द्रव्य खर्च करावयाचे. दऊळ बांधविल्याने आपल मान्यता वाढेल म्हणून पैसे कर्चावयाच व पंचात अभिमान रक्षणासाठी द्रवय खर्च करावयाचे, पण जीर्ण झालेलया देवळाचे पुनरुत्थान करण्यात एक पैही खर्चवयची नाही. निर्धन, भुने पीडित यांना दमडी देखील न देण्याचा पक्का निश्चय असावयच. दुर्बल, दीन, अनाथ, वृद्ध, रोगी, विधवा यांचे पालन करण्यात सर्व कुटुंबातील माणसांना आपल्या बरोबरीने वाढावे लागेल ्हणून स्वत:साठी पक्वान्नाचे जेवण करावयाचे नाही, पुष्कळसे धर्मात्म, पंडित, तपस्वी आमचे घरी येतात व अनेक येतील, सर्व देशी, परदेशी गुणवान् जैनांना मोठे ठिकाण काय ते माझे घरच आहे व मीच फक्त दाता आहे, दुसरे येथे कोण आहे( असा अभिमान धरावयाचा. कित्येक आपल्या घरीच कार्ये करण्यात व ती सुधारणयात मग्त नसून धर्मकार्यात ज्यांचे लक्ष आहे त्यांचा द्रव्याच्य मदाने मोठा अपमान करावयाचा, माझ्यापासून यांा उदरनिर्वह चालत असून मला सोडून कोठे राहतील( वगैरे अनेक तऱ्हेचे विचार मनात आणावयचे. याप्रमाणे पंचमकालातील धनाढ्य पुरुषाची बुद्धी मोहाने विकृत झाली आहे.

पूर्व जनमी जिनधर्मरहित असून कुतपश्चरण केले, कुपात्रांना दान दिले. त्यामुळे सध्या हे वैभव व संपत्ती प्रापत झाली आहे. ही सोडून धनावरीच मूर्च्छेने (प्रेमाने) मरण प्राप्त होईल व जसी कषायाची तीव्रता, मंदता असेल त्याप्रमाणे सर्पादिक तिर्यंच, वृक्षादि वनस्पती, मधुमक्षिकादि पक्षी या योनीत जन्म होईल व नरकात अनन्तकाल भ्रमण करावे लागेल. ही धनावरील आसक्ती इहलोकी वैर व अपयशाला कारण आहे. कृपण पुरुषाला सर्व लोक नाव ठेवीत असतात. कृपणाचे परिणाम नेहमी दुर्ध्यानाने भरलेले असतात. यासाठी बाबांनो, दानमार्गी खर्च होणारे धन हेच आपले आहे असे समजा.

पात्रदानात खर्चलेले धन मरणसमयी परिणाम निर्मल करून अंतर्मुहूर्तात स्वर्गसंपत्तीला प्रापत् करून देते. सांप्रत, उत्तम पात्र निर्ग्रंथ, वीतारागी, सर्व प्रकारचे मूलगुण व उत्तरगुण धारण करून दशलाक्षणिक धर्म पालन करणारे, बावीस परीषह सहन करणारे साधू आहेत दर्शनप्रतिमेपासून उद्दिष्टाहारत्यागप्रतिमेपर्यंत अकरा प्रतिमा धारण करणारे श्रावक मध्यम पात्र आहेत. ज्यांना व्रत नाही पण जिनेश्वरांनी वर्णिलेल्या तत्त्वावर आमरण पक्का भरवसा आहे, जे जन्ममरणरूपी संसारपरिभ्रमणापासून भयभीत ्सून चार प्रकारच्या संघाचे सदैव हित व्हावे अशी इच्छा ठेवणारे, संसार, देह भोग याविषयी विरक्ती उत्पन्न झालेले, जिनशासनाचा उद्द्योत करणारे, आपली निंदा करून स्वपरतत्त्वविचारात लीन असणारे, जिनकथित तत्त्वात व धर्मावर दृढ निश्च करणारे धर्म-अधर्माच्या फलाचा विचार करणारे, संपूर्ण जीवांविषयी अंत:करणात दया ठेवणारे, मंदकषायी, परमेष्ठीची भक्ती करणारे, सम्यक्त्वाचे संपूर्ण गुण धारण करणारे पुरुष आहेत ते जघन्य पात्र जाणारे. याप्रमाणे तीन प्रकारच्या पात्रांना यथायोग्य आहार, औषध, शास्त्र, वसतिकास्थान, व्सत्र, उपजीविका वगैरे स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून भक्तिपूर्वक व विनयाने दिले असता त्यांच्या पिरणामानुसार उत्तम, मध्यम, जघन्य भोगभूमीत दातारला जन्म िळतो व सम्यग्दृष्टि जीव सौधर्मादिक स्वर्गामध्ये महर्द्धिक देव म्हणून उत्पन्न होतात.

कुपात्राची लक्षण अशी असतात-खोट्या धर्माविषयी अंत:करणात दृढ प्रेम असते. त्यांना मिथ्यातपश्चरण करणाऱ्यावर दया करू त्यास मदत करावीशी वाटते. खोटे अथवा कठोर वचन न बोलता ते सर्वांशी गोड बोलतात. स्त्री-पुत्रमित्रकुटुंबाविषयी निस्पृहता ठेवतात, पण निरंतर मिथ्याधर्माचे सेवन करतात. जप, तप, संयम, शील, नियम याविषयी याना ादर असतो, कषाय मंद करून व परिग्रहांचा त्याग करून जे अरण्यात राहतात, पापारंभ न करता परीषह सह करतात, कोणत्याही प्रकारचे दु:ख न करता संतोषाने सरस नीरस प्राप्त झालेल्या भोजनाचा शांतपणे लाभ घेतात, क्षमा धारण करतात पण आत्मज्ञानाशिवाय बाह्य क्रियाकांडानेच मोक्ष होतो असे मानतात ते सर्व कुपात्र जाणावेत.

कित्येक जिनधर्मातील लोक एकांती बनून आपल्याच मताची हट्ट धरून स्वत:स धर्मात्मा मानतात. यापैकी कित्येक जिनेश्वराचे भजन, पूजन, आराधना इत्यादि कृत्यात कृतकृत्यता मानतात. ज्ञानाभ्यासव्रतादिक क्रियांविषयी अनास्था दाखवितात. कित्येक पाण्याने वरचेवर अंगोपांग स्वच्छ करणे, अन्नादिक सामग्री वरचेवर धुणे, स्नान करणे आपल्या हाताने बनविलेले भोजन करणे, वस्त्रप्रावरणे धुणे, धुतलेल्या जागीच भोजन घेणे वगैरे क्रिया करण्यातच धर्म घडतो असे मानतात. दुसरे कित्येक सावधानपूर्वक चालणे, बसणे, उठणे, निजणे, पाणी वगैरे मोठ्या काळजीने सांडणे, वापरणे, गाळणे या

क्रिया केल्यानेच आपण कृत्यार्थ होऊ, याशिवाय तिर क्रिया निरर्थ आहेत असे मानतात. कित्येक उपोषण, व्रत रसपरित्यागांनी आपणास श्रेष्ठ मानतात. कित्येक दु:खित बुभुक्षितांना दान देण्यात धर्म मानतात. कित्येक भोळे जीव सर्व धर्म समान आहेत, त्याबाबत ्धिक सूक्ष्म विचार करण्याची जरू री नाही असे मानतात. कित्येक परमेश्वराचे नामस्मरण करण्यातच धर्म आहे असे मानतात, कित्येक इतर जीवावर उपकार करण्यात व सर्वांचा विनय करण्यात धर्म मानतात, कित्येक फक्त इंद्रियनिग्रह करू न उपोष करण्यातच धर्म मानतात, कित्येक अनेक प्रकारचे भेष धारण करू न कषाय मंद करू न, परिग्रह सोडून राहतात. कित्येक एक वेळ अन्न ग्रहण करू न पुनरपि याचना न करता तेवढ्यात संतोष मानून राहतात. याप्रमाणे अनेक लोक एकांतपक्षी बनल्याने त्यांना खरे आत्मज्ञान होत नाही. त्यामुळे ते सर्व कुपात्र जाणावेत. त्यांना दान दिले असता व ते अनेक प्रकारांनी फळाला येते. जसे पात्र, जसा दाता, जसे परिणाम, जसे द्रव्य व जसा विधी असेल तसे फल प्राप्त होत असते.

कित्येक जीव कुपात्र-दानामुळे कुभोगभूमीतील असंख्यांत द्वीपामध्ये पंचेंद्रिय तिर्यंचाचे युगल होऊन जन्मतात, त्याकिाणी त्यांना चार अंगुलप्रमाण सुगंधी गवत भक्षण करण्यात मिळते. अमृतासारखे मधुर पाणी पिण्यास प्रापत् होते. परस्परात वैर विरोध मुळीच नसतो. शीत उष्ण, ऊन, थंडी, वारा, पाऊस यांची बाधा होत नाही, एक पल्य आयुष्य प्रापत् होते. विकलत्रयाची त्या ठिकाणी पीडा नसते. तेथे अनेक प्रकारचे स्थलचर नभस्चर, तिर्यंच जीव असून यथेच्छ विहार करू न सुखाचा अनुभव घेतात. एक युगलानंतर त्यामागे दुसरे युगल उत्पन्न होते. पहिले युगल मरणानंतर व्यतरवासी, भवनवासी, ज्योतिषवासी देवांमध्ये उत्पन्न होते. कोणी कुपात्रदानाच्या प्रभावाने उत्तरकुरू-देवकुरू भोगभूमीत तिर्यंच होऊन तेथे तीन पल्यपर्यंत सुख भोगून देवलोकी उत्पन्न होतात. कित्येक हरिक्षेत्र, रम्यकक्षेत्रामध्ये दोन पल्य आयुष्य घेऊन व कित्येक हैमवत, हैरण्यवतक्षेत्रात एक पल्याचे आयुष्य घेऊन तिर्यंच युगलात जन्म घेतात व तेथून मरणानंतर देवलोकी जन्मतात.

कित्येक कुपात्रदानप्रभावाने शहाण्णव अंतरद्वीप आहेत त्यात मनुष्ययुगल होऊन जन्मतात. समुद्राच्या चतुर्दिशांना चार द्वीप आहेत. त्यातून पूर्व दिशेच्या द्वीपामध्ये एक पाय असणारी माणसे, दक्षिण दिशेच्या द्वीपामध्ये शेपूट असणारी माणसे, पश्चिमेला शिंगे असणारी व उत्तरेला वचन नसणारी मुकी माणसे उत्पन्न होतात. चार विदिशांच्या चार द्वीपात अनुक्रमे सुपासारख्या कानाची व शष्कुली (कानवल्याच्या आकारासारख्या) कानाची माणसे उत्पन्न होतात. एक कान आंथरू न एक कान पांघरू न निजण्याइतके लांब त्यांचे कान अतात. लंबकर्ण व सशासारखे कान असलेली माणसे समुद्रच्या विदिशांनाच उत्पन्न होतात. सिंहासारखे, घोड्यासारके, कुत्र्यासारखे, डुकरासारखे, हलगटासारख, वाघासारखे, घुबडासारके, वानरासारखे, माशासारखे, मेंढ्यासारखे, गाईसारखे, हत्तीमुकासारखे ज्यांचे मुख आहे व ज्यांचे मुख काळे,ढगाच्या रंगाचे, विजेसारखेच चमकदार व दर्पणासारके निर्मल अशी तोंडे धारण करणारी माणसे सोळा विदिशांच्या अंतर्गत भागात व पर्वताच्या अंतापर्यंत जे द्वीप आहेत त्यात उत्पन्न होतात. याप्रमाणेच लवमसमुद्रच्या एका तटावर चोवीस अंतरद्वीप आहेत. दोन्ही तटावर मिळून ४८ अंतरद्वीप व कालोदधि समुद्राचे ४८ असे एकूण ९६ अंतरद्वीपात कुभोगभूमि आहे. त्या ठिकाणी

कुपात्रदानाच्या प्रभावाने मनु्ययुगल उत्पन्न होते. आता एक पाय असणारे युगल गुहेत राहते व गोड अशी तेथील माती भक्षण करते. याहून दुसरी जी या प्रकारची माणसे आहेत ती वृक्षाखाली राहतात व कल्पवृक्षापासून प्राप्त होणारी अनेक प्रकारची फळे भक्षण करीत असतात.

कुभोगभूमीत मनुष्य होऊन जन्म घेण्याचा कारण असे परिणाम कसे असतात याचे वर्णन त्रैलोक्यसार ग्रंथात केले आहे ते असे.

जिणलिंगो मायावी जोइसमंतोवजीवि धणकंखा।

अइगउरवसंजुत्ता करंति जे परविवाहं च।।१।।

दंसणविराहिया जे दोसं णालोचयंति दूसणगा।

पंचग्गितवा मिच्छा मोणं परिहरिय भुंजंति।।२।।

दुब्भाव असुइसूदगपुप्फेहिं जाइसंकरादीहिं।

कयदाणा वि कुपत्ते जीवा कुमरेसु जायंते।।३।।

अर्थ - जिनमुद्रा धारण करून अनेक परीषह सहन करीत असूनही जे मायाचाराचे परिणाम धारण करतात, जिनलिंग धारण करून कित्येक ज्योतिषविद्या, मंत्रविद्या, वैद्यविद्या याही करून जगात आपले उदरंभरण करतात व धनाची इच्छा ठेवतात( जिनलिंग घेऊन प्राप्त झालेल्या ऋद्धीचा गर्व करतात, आम्हीच काय ते जगात पूज्य, आमचीच काय ती जगात प्रतिष्ठा म्हणून गर्वाने फुगन जातात, साताकर्माच्या उदयाने प्राप्त होणाऱ्या सुखामुले ज्यांना गर्व वाटतो, जिनलिंग धारण केलेले असून ज्यांना आहाराची इच्छा होते, अशुभ कर्माच्या उदायने ज्यांना भय वाटते, मैथुन करण्याची ज्यांना इच्छा असते, परिग्रह शिष्यसंप्रदायची ज्यांना अपेक्षा असते व जिनलिंग धारण करून दुसऱ्याचे विवाह करून देणअयात जे प्रवृत्त होतात ते सर्व कुतपाच्या प्रभावाने कुमनुष्यात जाऊन जन्मतात. जिनमुद्रा धारण करून ज्यांनी सम्यग्दर्शनाची विराधना केली आहे ्से तपस्वी आपल्या गुरूजवळ घडलेल्या दोषांची आलोचना करीत नाहीत, आपण धारण केलेल्या लिंगास अयोग्य असे लोकांचे दोष आपल्या मुखावाटे काढतात, जे मिथ्यादृष्टि पंचाग्नि तपश्चरणाने कायक्लेश करतात, जे मौन न धरता भोजन करतात, जे दुष्ट विचाराने दान देतात, अशुद्ध राहून दान देतात, सूतक असताना दान देतात, रजस्वला स्त्रीचा संसर्ग करून दान देता, जातिसंकर करून दान देतात, कुपात्राला दान देतात व कुमानुषात उत्पन्न होतात, कोणत्याही प्रकारचे दु:ख न भोगता एक पल्यपर्यंत आयुष्य धारण करून एकाच वेळी दोघेही मरण पावतात व बरोबरच जन्म घेतात, दानाच्य व तपाच्य प्रभावाने सदैव सुखात मग्न होऊन काल पूर्ण करतात व मंदकषायांच्या प्रभावाने भवनत्रिकामध्ये जाऊन उत्पन्न होतात, कित्येक कुपात्रांना दान देऊन पुष्कळ भोगोपभोग भोगणारे म्लेंच्छ होऊन मनुष्यलोकात जन्म घेता. कित्येकांना नीच कुलात उत्पन्न होूनही पुष्कळ धनप्रापती होते. मांसभक्षण, मद्यपान, वेश्यासकर्ती करूनही ते निरोगीच असतात.

कित्येकांना कुदानाच्या प्रभावामुळे राजाच्या घरी दास-दासी, हत्ती-घोडा, श्वान, वानर वगैरे योनीत जन्म घेऊन राहावे लागते व सुंदर भोजन, वस्त्र आभरण वगैरे भोगोपभोगांची प्रचुर सामग्री भोगण्यास मिळते. पण मरणोत्तर सर्वांना दुर्गतीला जावे लागते. ज्याअर्थी कुपात्र अनेक प्रकारचे व दाताराचे परिणामही अनेक प्रकारचे व दानाची समाग्रीही अनेक प्रकारची आहे त्याअर्थी त्याचे फलही अनेक प्रकारचे प्राप्त होत असते.

जो भुकेला, दरिद्री, आंधळा, लंगडा, पांगळा, रोगी, अशक्त, वृद्ध, बालक अनाथ, विदेशी, संघातून चुकलेला, बंदिगृहात अडकलेला, बांधलेला, दुष्टांच्या तापाने भयभीत होऊन आलेला, लुटला गेलेला, विधुर व भयभीत पुरुष वा स्त्री, बालक, कन्या, पशू कोणीही असो, जो क्षुधा, तृषा, शीत, उष्ण, रोग व वियोगादि दु:खाने गांजलेला असेल त्याला दु:खित जाणून करुणाबुद्धीने भोजनवस्त्रादिक देणे याला दयादान म्हणतात. यातही जाति, कुल, आचरण वगैरे पाहून यथायोग्य दान करावे. अभक्ष्य-भक्षण करणारे असतील त्यांना फक्त अन्न व औषधी द्यावी, पैसे देऊ नयेत. ज्यांचे निंद्य आचरण नसेल त्यांचे दु:ख दूर होण्याइतकेच द्रव्य व स्था नद्यावे. हा दु:खी मनुष्य उपदेश देण्यायोग्य आहे असे वाटल्यास त्याला उपदेश, भोजन, वस्त्र, औषध, स्थान वगैरे द्यावे. उपदेश देण्यायोग्य नाही त्यार्थी दु:खित जाणून भाकर तुकडा द्यावा. ज्यांची सेवा करण्यासारकी असेल त्यांचे वैयावृत्य करावे. करुणादान हे पात्रापात्राचा विचार न करता केवळ दया मनात ठेवून द्यावे. तरी पण देश, काल, परिणाम, जाति, कुल यांचा विचार करून देत असले पाहिजे. मांसभक्षी, मद्यपी लोकांना पैसे देऊ नयेत. अतिशय दु:खी असलेला पाहून करुणा उत्पन्न झाली तर अन्नदान द्यावे. त्यापासून आपली कीर्ती व्हावी अशी इच्छा करू नये. दान देण्यायोग्य नाहीत ते अपात्र जाणावेत.

ज्यांच्या मनात दया नसेल, ज नेहमी हिंसा करीत असतील, जे अत्यंत लोभी असतील, परिग्रह वाढावा असी ज्यांची सदैव इच्छा असेल, ते केवळ धनवान पुरुषाजवळ नेहमी याचना करणारे असतील, वेदोक्त धर्माविषयी ज्यांना प्रेम वाटत असेल, चंडी, भवानी, वगैरे देवींची जे सेवा करीत असतील, बकरा, रेडा वगैरे पशूंचा जे घात करवीत असतील, कुदान ग्रहण करीत असतील. मद्य, मांस वेश्या वगैरे व्यसनात आसक्त सतील, जिनधर्माचा द्रोह करीत असतील, परधन, परस्त्रीची इच्छा करून आपली प्रशंसा करीत असतीतल, व्रतांचे ढोंग दाखवून पंचपापाचरण करीत असतील, बव्हारंभ, बहुपरिग्रह, तीव्रकषाय, असत्य भाषण, कुशास्त्रोपदेशक आणि जिनशासनात खोटे लिहून त्याचे प्ररूपण करणारे अतील, व्यसनी, पाखंडी अभक्ष्यभक्षक, व्रत, शील, संयम, तपापासून पराङ्मुख, विषयलोलुप, जिव्हेन्द्रियाच्या वश झालेले, मिष्टान्नभक्षक, असे सर्व जीव अपात्र जाणावेत. त्यांच्या ठिकाणी रत्नत्रयाचा अभाव असल्याने पात्रपणा नाही. अन्य धर्मानुयायाप्रमाणे दया, क्षमा, संतोष, सत्य, शील, त्याग, पूजा, जपजाप्य, नामस्मरण वगैरे कृत्यामध्येही ज्याला प्रीती नसते तो कुपात्राच्या पलीकडचा अधम अपात्र असून अत्यंत लोभी, मदोन्मत्त व विषयलंपटी असतो. धर्माचरणाची इच्छा त्याच्या मनात नसते. केवळ जिव्हेन्द्रियाला नाना प्रकारच्या भोजनांनी पुष्ट करण्याकरिता जैन नाव धारण केले आहे. धन लुटण्याकरिता जैनाचा भेष घेतला आहे, आपली पूजा व्हावी व धनाचा लाभ व्हावा या हेतूने व्रत,

तपश्चरण, पठनवाचनादिक क्रिया करीत आहे तो अपात्र म्हणून दानाला योग्य नाही. अशा पुरुषाला दान देणे हे पाषाणाच्या जागी बी पेरल्याप्रमाणे कडू तुब्यात दुध ठेवल्याप्रमाणे, अरण्यात चोराच्या ताब्यात आपले धन सोपवण्यासारखे, जगावे म्हणून विषभक्षण करण्यासारखे, रोग दूर करण्याला अपथ्य भोजनासारखे, सापाला दूध पाजण्यासारखे, दु:खोत्पत्तीचे बीज आहे. अंधकूपात धन टाकून द्यावे पण अपात्राला दान करू नये. अपात्राला दान करणे हे आपल्या घरात विषाचे झाड वाढविणे आहे. अपात्राचा संबंध दावाग्निसारखा दुरूनच त्यागण्यासारखा आहे. ज्याप्रमाणे विषवृक्षाची वासना मूर्छित करण्यास कारण होते तशी अपात्राची वासना आत्मज्ञानापासून भ्रष्ट करते.

आता चार प्रकारचे दान देऊन जे आगमप्रसिद्ध झाले त्यांची नांवे सांगतात -

श्रीषेणवृषभसेने कौण्डेश: सूकरश्च दृष्टान्ता: ।

वैयावृत्यस्येते चतुर्विकल्पस्य मन्तव्या: ।। ११८ ।।

अन्वयार्थ - (श्रीषेणवृषभसने) आहारदानाच्या फलाने श्रीषेण राजा, औषध दानाच्या प्रभावाने वृषभसेना नामक एक सावकाराजी मुलगी, (कौण्डेश:) शास्त्रदानाच्या प्रभावाने कौंडेश नांवाचा गवळी जो पुढच्या जन्मी श्रुतकेवली झाला, (सूकरश्च) आणि वसतिकादानाच्या प्रभावाने सूकर, जो मरणानंतर स्वर्गात महर्धिक देव झाला असे हे चार जीव प्रसिद्ध आहेत. (एते चतुर्विकल्पस्य वैयावृत्यस्य दृष्टान्ता: मन्तव्या:) हे चार प्रकारच्या वैयावृत्याचे (दानाचे) चार दृष्टांत आहेत.

दानाचा प्रभाव अचिंत्य आहे. इहलकी देखील दान करणाऱ्या पुरुषाची मान्यता होते. पण दान देऊन त्यापासून अमुक अमुक विषयोपभोगांची प्रापती व्हावी अशी इच्छा त्याने मनात मुळीच ठेवता कामा नये. दानाचे फल इंद्रियोपभोग प्रापत् व्हावे अशी जे इच्छा करतात ते चिंतामणी रत्न देऊन त्याच्या बदल्यात काचेचा तुकडा घेतात, ते अमृत टाकून विष-प्राशन करतात, दोऱ्यकरिता नवरत्नाचा हार देऊन टाकतात, जाळण्याकरिता कल्पवृक्ष तोडतात. लोखंड पाहिजे म्हणून नाव तोडतात व आपल्या गळ्यात मोठा दगड बांधून खोल डोहात उडी मारतात असे समजावे.

इंद्रियांचे विषय अग्निप्रमाणे दाह उत्पन्न करणारे आहेत, कालकूट विषाप्रमाणे अचेतन करून मारणारे आहेत, पंचपापामध्ये, प्रवृत्ती करविणारे आहेत, तृष्णा उत्पन्न करून नरकाला पोचविणारे आहेत. म्हणून वैर उत्पन्न करण्यास कारण असून ज्वाराप्रमाणे संताप, मूर्च्छा, प्रलाप, दु:ख, भय शोक व भ्रम उत्पन्न करणारे आहेत. विषयांचे चिंतन जीवाला अचेतन करते मग त्यांचे सेवन केले तर अनेक भवात मरणप्राय दु:ख देईल यात नवल नाही. म्हणून विषयांची इच्छा न ठेवता दान-धर्म करण्यास प्रवृत्त व्हावे. लाभांतराय कर्माच्या क्षयोपशमापासून आपणास जेव्हढे धन प्राप्त होईल त्यात संतोष मानून पुढे अधिक इच्छा करू नये. पावशेर अन्न खाण्यास मिळाले तरी त्यातून दानाचा भाग काढून ठेवावा. दान करण्याकरिता म्हणून धन पाहिजे असेही मनात बाळगू नये. सर्वत्र इच्छेचा अभाव हेच दान व हेच उत्कृष्ट तप आहे. वैयावृत्याला अतिथिसंविभाग व्रत असे म्हटले आहे.

वैयावृत्यात जिनपूजेचाही अंतर्भाव होतो म्हणून त्याविषयी सूत्र सांगतात -

देवाधिदेवचरणे परिचरणं सर्व दु:खनिर्हरणं।

कामदुहि कामदाहिनि परिचिनुयादादृतो नित्यम्।। ११९।।

अन्वयार्थ - (कामदुहि) जे सर्व इच्छा परिपूर्ण करणारे आहे, (कामदाहिनि) जे काम-मदानाला जाळून टाकणारे आहे (देवाधिदेवचरणे) देव म्हणजे इंद्र त्यांचा अधिवेद म्हणजे स्वामी अरिहंतदेव त्यांच्या चरणी (परिचरणं) परिचरण-पूजन (नित्यंत आदृत: परिचिनुयात्) हे नेहमी आदराने करावे.

विशेषार्थ - गृस्थाने दररोज जिनपूजन करणे यासारखे दुसरे उत्तम कार्य कोणतेही नाही. अशुभ कर्माच्या अभावामुळे मनुष्य तिर्यंचाप्रमाणे सत्पधातुमय देह ज्यांचा नाही, आहाराची इच्छा नसल्याने क्षुधा-तृषेची ज्यांना वेदना नाहीसी करण्याचे कारण पडत नाही, कंठात अमृत वाहत असल्याने ज्यांना क्षुधातृषेची बाधा होत नाही, जरा, रोग वगैरे विकार ज्यांना होत नाहीत, त्यांना देव म्हटले आहे. ज्यांना ज्ञानावरण वीर्यांतरायादिक कर्माचा याहून अधिक क्षयोमशम झाला असेल त्यांना इतर देवांमध्ये नसणारी ज्ञान व वीर्याची शक्ती अधिक प्राप्त् झाली आहे. म्हणून देवांचा स्वामीपणा